रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १०९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹




आजचा अग्रलेख
पोपट आणि मालक

## वेधक

### बुधवारच्या सुनावणीकडे लक्ष

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ३९ आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी येत्या बुधवारी, १८ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. शिंदे गटाच्या आमदारांना पात्र करणारा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला. याविरोधात शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सुनील प्रभू यांच्यामार्फत याचिका दाखल झाली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे.बी. पारडीवाला व न्या. मनोज मिश्रा यांच्या पूर्णपीठासमोर या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. दरम्यान, अचानक आमदार अपात्रतेच्या सुनावणी दि.१८ सप्टेंबर असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर झळकले आहे.

### केजरीवाल देणार राजीनामा

**नवी दिल्ली :** मी दोन दिवसांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार आहे. जोपर्यंत जनता निकाल देत नाही, तोपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही. मी आणि मनीष सिसोदिया जनतेमध्ये जाऊ, अशी घोषणा अरविंद केजरीवाल यांनी रविवारी (दि. १५) केली. दिल्ली विधानसभा विसर्जित होणार नाही. माझ्या जागी दुसरे मुख्यमंत्री असतील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आप कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते बोलत होते. अरविंद केजरीवाल यांना दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयातून शुक्रवारी जामीन मंजूर झाला होता. केजरीवालांनी आप कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगितले.

## आर्थिक हितसंबंध जपण्याकडे प्रशासनाचा कल

# आमदारांच्या गावात ‘ना नल, ना जल’

**। अलिबाग । कृषीवल टीम ।**

संपूर्ण ग्रामीण भागात, वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या जनतेला नळ जोडणीच्या माध्यमातून शुद्ध आणि स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा, याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलजीवन मिशन योजनेद्वारे ‘हर घर नल, हर घर जल’ ही योजना अस्तित्वात आणली. २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येकाच्या घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे गुणवत्तापूर्ण शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशनचे काम युद्धपातळीवर सुरु करण्याचा दिखावा निर्माण केला. मात्र, प्रत्यक्षात सरकार दरबारी असलेली आकडेवारी व प्रत्यक्षात झालेली कामे यामध्ये घोटाळा असल्याचे सर्वेतून स्पष्ट झाले आहे. एवढेच नव्हे तर, सत्ताधारी आमदारांच्या थळ गावातही मागणी असूनही नळजोडणी झाली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री योजना रंगविणाऱ्या अधिकाऱ्यांसह मिलीभगत करुन आर्थिक हितसंबंध जोपासणारे सरकार, ठेकेदार यांच्यावर कठोर कारवाई करण्याची पान २ वर

> थळसह अनेक भागातील जलजीवन व हर घर योजनेच्या कामाबाबत उपअभियंता यांना पाहणी करण्याची सूचना केली जाईल. शासनाकडून निधीची उपलब्धता नसल्याने अनेक कामे प्रलंबित आहेत.
> – संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद

### नाव मोठं, लक्षण खोटं

अलिबाग तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये थळ ग्रामपंचायतीचा समावेश होतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम असतानाही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकासकामांना आखडता हात घेत असल्याचा आरोप थळमधील ग्रामस्थांनी केला आहे. रस्त्यांची दुरवस्था, पाण्याचे हाल, जागोजागी कचरा यामुळे नागरिक बेजार झाले आहेत.



### आरसीएफ कंपनीकडून पाणीपुरवठा सुरू

गेली कित्येक वर्षे थळ गावाला आरसीएफ कंपनी पाणीपुरवठा करीत आहे. थळ बाजारात सतत पाण्याची बोंब असल्यामुळे कंपनी प्रशासनाकडे ग्रामस्थांनी नवीन पाईपलाईनची मागणी केली होती. त्यानुसार कंपनीने थळ बाजारातील ग्रामस्थांसाठी नवीन लाईन सुरु करुन पाणीप्रश्न सोडविला. यासाठी ग्रामपंचायत तसेच प्रशासनाचे कोणतेही योगदान नसून स्वःखर्चाने पाणी घेतल्याचे रुबीन साखरकर यांनी सांगितले.

> समाजकारणासाठी राजकारण करणे अपेक्षित आहे. मात्र, विरोधक पाण्याचे राजकारण करीत आहेत, ही लाजिरवाणी बाब आहे. जलजीवन मिशन अंतर्गत थळमध्ये १०० टक्के नळजोडणी केली असेल, तर नागरिकांना पाण्यासाठी वणवण का करावी लागतेय? याकडे सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामस्थांनी ६ ते ८ महिन्यांपूर्वी जर नळजोडणीसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज केले असतील, तर त्यांनी अजून किती वेळ वाट पाहावी, याचे उत्तर प्रशासनाने देणे गरजेचे आहे.
> – चित्रलेखा पाटील, जिल्हा महिला आघाडी प्रमुख, शेकाप

### कोट्यवधींचा चुराडा

अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे कोट्यवधी रुपयांचा चुराडा होऊनही सत्ताधारी आमदार मात्र मूग गिळून आहेत. त्यामुळे नेत्यांसह अधिकाऱ्यांची चांगलीच मिलीभगत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. अलिबाग तालुक्यात अनेक गावांत योजनेला घर घर लागल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणची कामे काही तांत्रिक अडचणींमुळे ठप्प आहेत. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या कामात मोठा भ्रष्टाचार होत असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. अधिकाऱ्यांवर कोणताही अंकुश नसल्यामुळे ठेकेदार आणि अधिकारी हातमिळवणी करीत असून, या योजनेतही हात ओले झाल्याशिवाय योजना पुढे सरकत नसल्याचा आरोप थळमधील ग्रामस्थांनी केला आहे.

# रेल्वे प्रशासनाकडून ‘मराठी’वर अन्याय


- आरक्षणाचे फॉर्म चक्क गुजराती भाषेत
- स्थानक प्रबंधकांची अरेरावी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत स्थानकात असलेल्या संगणकीय आरक्षण केंद्र येथे गाड्यांचे आरक्षण करण्यासाठी प्रवाशांना भरण्यासाठी दिलेले फॉर्म हे चक्क गुजराती भाषेत दिले आहेत. त्याबाबत स्थानिक मनसे कार्यकर्त्यांनी कर्जत स्थानक प्रबंधक यांच्याकडे जाऊन जाब विचारला असता स्थानक प्रबंधक प्रभाष कुमार लाल यांची भाषा फार उर्मट होती. दरम्यान, कर्जत स्थानकाचे कमर्शियल प्रबंधक शिरीष कांबळे यांनी स्थानिकांच्या भावनांचा आदर राखत संगणकीय आरक्षण केंद्र येथे मराठी भाषेतील फॉर्म उपलब्ध करून दिल्याने संभाव्य राडा टळला आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात मराठीऐवजी गुजराती भाषेतील आरक्षण फॉर्म मिळत असल्याची माहिती मनसेच्या महिला शहर अध्यक्ष भारती कांबळे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कर्जत स्थानकातील संगणकीय आरक्षण केंद्र येथे फॉर्म मागवून घेतला असता त्यांना धक्काच बसला. त्यावेळी भारती कांबळे यांनी मराठी पान २ वर

> मराठी राजभाषेचा अवमान आम्ही सहन करणार नाही. स्थानक प्रबंधक यांची भाषा सुधारली पाहिजे अन्यथा आंदोलन करावे लागेल.
> – प्रभाकर गंगावणे, सचिव, कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन



### स्थानक प्रबंधकाने उधळली मुक्ताफळे

याबाबत प्रवाशांनी कर्जत रेल्वे स्टेशन मास्तर यांना विचारणा केली असता त्यांनी याबाबत उडवाउडवीची उत्तरे देऊन मराठी भाषेचा अपमान करुन महिला प्रवाशांना उद्धट भाषा वापरली. त्यावेळी स्थानक प्रबंधक लाल यांनी भारती कांबळे यांना इतर ठिकाणी तुम्ही मराठी मराठी करत नाहीत. रेल्वेच्याच कारभारात तुम्ही मराठी मराठी का करता, अशी मुक्ताफळे उधळण्यास सुरुवात केली.

# शिक्षकांचा ‘शाळा बंद’चा इशारा

## येत्या २५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नेमण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. वाड्या-वस्त्यांमधील विद्यार्थ्यांवरील अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्यात यावी, अशी मागणी सर्व शिक्षक संघटनांकडून जोर धरत आहे. शासन निर्णयाविरोधात येत्या २५ सप्टेंबर रोजी सर्व शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा शिक्षक संघटनेने दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अडीच हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळा बंद राहण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षक संचमान्यतेबाबत १५ मार्च २०२४ व कंत्राटी शिक्षक भरतीबाबतचा ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय काढण्यात आला आहे. या शासन निर्णयाविरोधात सर्व शिक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागात शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांचे या निर्णयामुळे प्रचंड नुकसान होण्याची भीती शिक्षक संघटनेने व्यक्त केली आहे. वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांसाठी हा शासन निर्णय अन्यायकारक असल्याने दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत, या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा दि.२५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार सर्व संघटनांच्या बैठकीत पुणे येथे घेण्यात आला. त्यानुसार जिल्ह्यातील शिक्षकांनी मोर्चाची तयारी सुरू केली आहे. जिल्हा, तालुका स्तरावर बैठका घेऊन त्याचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. शिक्षकांना शाळा बंदसह मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या दोन हजार ५२८ शाळा असून, पाच हजार ५४५ शिक्षक ९१ हजार ३४३ विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. त्यामुळे येत्या २५ सप्टेंबरला या शाळा बंद ठेवणार असल्याची माहिती शिक्षक संघटनेकडून देण्यात आली आहे.

# श्रेय घ्या, पण तालुक्याचे प्रश्नही मार्गी लावा!

- मंत्री अदिती तटकरेंना विकास आघाडीचे खडेबोल
- रुग्णालय सुरू करण्यास अडीच वर्षे का लागली?

**। तळा । वार्ताहर ।**

आपल्याच पाठपुराव्यामुळे तळा ग्रामीण रुग्णालय सुरु झाल्याचा दावा मंत्री अदिती तटकरे यांनी रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यादरम्यान केला होता. हे रुग्णालय सुरू व्हावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या विकास आघाडीच्या विराज टिळक आणि रामदास तळकर यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले आहे. रुग्णालय सुरू झाल्याचे श्रेय त्यांनी घ्यावे, पण त्याचबरोबर तालुक्यातील इतर प्रश्नदेखील त्यांनी मार्गी लावावेत, असे खडेबोल सुनावले आहेत.


तळा येथील ग्रामीण रुग्णालय अडीच वर्षांपासून बंद होते. हे ग्रामीण रुग्णालय सुरू व्हावे अन्यथा आंदोलन छेडावे लागेल, अन्यथा रुग्णालयाचे श्राद्ध घालण्याचा इशारा देणारे पत्र तळा विकास आघाडीकडून जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांना देण्यात आले होते. त्या पत्राची दखल घेत आठ दिवसांत हे रुग्णालय सुरु करण्याचे लेखी आश्वासन डॉ. देवमाने यांनी विकास आघाडीला दिले होते. त्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून हे रुग्णालय सुरूदेखील करण्यात आले. त्यानंतर १२ सप्टेंबर रोजी मंत्री अदिती तटकरे यांनी मंत्रालयात एक बैठक घेऊन या रुग्णालयात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर त्यांनी या रुग्णालयाची पाहणी केली आणि आपल्याच पाठपुराव्यामुळे हे रुग्णालय सुरु झाल्याचा दावा केला. त्यांच्या या दाव्याला प्रत्युत्तर देताना, श्रेय जरूर घ्या, पण रुग्णालय सुरु करण्यासाठी अडीच वर्षे का लागली याचेही उत्तर ना. तटकरे यांनी द्यावे, असे आव्हान विराज टिळक आणि रामदास तळकर यांनी दिले आहे. पान २ वर

# सरकारकडून सत्तेचा गैरवापर

## शरद पवारांचा जोरदार हल्लाबोल

**। धुळे । प्रतिनिधी ।**

सध्या देशापुढे महागाई, बेरोजगारी, शेतमालाचा हमीभाव अशा अनेक समस्या असताना सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधात धोरण राबवत आहे. अनेक ठिकाणी सत्तेचा गैरवापर झाल्याची उदाहरणे दिसून येतात. सत्ता ही जनतेची सेवा करण्यासाठी असते. पण सत्तेचा माज डोक्यात गेल्यानंतर त्याचा गैरवापर सुरू होतो. असा उन्माद चढलेल्या लोकांना त्यांची जागा दाखवण्याचे काम जनतेला करावे लागेल, असे आवाहन राष्ट्रवादीचे खासदार शरद पवार यांनी केले.



> सत्ता ही लोकांच्या कामांसाठी असते. पण काही लोकांकडे सत्ता हातात आल्यानंतर सत्ता डोक्यात शिरते आणि सत्तेचा गैरवापर होतो. सध्या राज्याची सत्ता चुकीच्या लोकांच्या हातामध्ये सत्ता आहे. ती सत्ता उद्या महाविकास आघाडीच्या हातात देणं हे काम तुम्हाला करायचं आहे. मी तुम्हाला शब्द देतो की, तुम्ही राज्य हातामध्ये द्या, महाराष्ट्राचा चेहरा हा बदलल्याशिवाय राहणार नाही.

शिंदखेडा येथे रविवारी (दि.१५) शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी महायुतीवर हल्लाबोल करीत चांगलाच समाचार घेतला. पवार पुढे म्हणाले पान २ वर

# प्रिया नाईक यांची हत्या, दोघे जण ताब्यात

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील माणेक नगर सोसायटी येथील प्रिया प्रल्हाद नाईक (४४) यांची अज्ञात इसमाने गळा आवळून हत्या केल्याप्रकरणी आरोपींविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. यातील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केल्याची माहिती समोर आली आहे.

१३ सप्टेंबर रोजी प्रिया नाईक यांच्या गळ्यावर व्रण व नाका-तोंडातून रक्त येत होते. त्यांना सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, पान २ वर

पाचवा स्मृतिदिन



कै.सौ. सरीता गिरीधर पिंगळे
स्वर्गवास : १६-०९-२०१९

होतिस चंद्रभागा म्हणजेच सरीता
कसा सोडवावा तुझ्या आठवणींचा गुंता
परिचय तुझा गे वावोशी छत्तीशित
एकरूप झालीस गोरठण गावात
आहेस तू अजूनी आमच्या घरात
गुण गौरव तुझा ग घराघरात ।।

तुझी आठवण काढणारे
श्री. गिरीधर काशिनाथ पिंगळे (पती), श्री. सुजितकुमार गिरीधर पिंगळे, सौ. सायली सुजितकुमार पिंगळे, श्री. अजितकुमार गिरीधर पिंगळे, सौ. अस्मिता अजितकुमार पिंगळे,
नातवंडे : कु. स्वप्नाली, कु. समृद्धी, शुभम, रोहन, रोहित.
गोरठण बु. (वावोशीफाटा) ता. खालापूर, जि.रायगड

## महानगरपालिकेकडून गरोदर मातांना मिळणार मोफत सेवा

# रुग्णवाहिकेसाठी टोल फ्री नंबर

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

एका गरोदर महिलेच्या प्रसूती वेदनेवेळी रुग्णालयात नेण्यासाठी वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध होऊ न शकल्याने संबंधित महिलेला हातगाडीवर रुग्णालयात नेण्यात आल्याची घटना पनवेल पालिका हद्दीत काही दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये व जनसामान्यास महापालिका देत असलेल्या सोयी-सुविधांची माहिती मिळण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातेस उपलब्ध मोफत रुग्णवाहिका सेवेचे टोल फ्री नंबर लवकरात लवकर कार्यान्वित होणार आहेत.

> रुग्णवाहिकेच्या १०८ क्रमांक आस्थापनेस याबाबतचा संपूर्ण खुलासा सादर करण्याबाबत चौकशी समितीने सूचित केले आहे. भविष्यात अशा संदर्भ सेवेपासून रुग्णांनी वंचित राहू नये यासाठी पालिकेच्या रुग्णवाहिकेसाठी टोल फ्री नंबर लवकरच सुरू करण्यात येणार आहे. टोल फ्री नंबर आल्यानंतर यास व्यापक प्रसिद्धी देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.



आजपर्यंत महापालिकेच्यावतीने गरोदर मातेसाठी निः शुल्क उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकेने २८९ प्रसूती रुग्णांसाठी अगदी मुंबईपर्यंत संदर्भ सेवा दिली आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेतील प्रसूती रूग्ण परदेसी गौंड यांना न मिळालेल्या संदर्भ सेवेबाबत चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या प्राथमिक अहवालानुसार प्रसूतीपूर्व आशा सेविका व आरोग्य सेविकांमार्फत वारंवार भेट देऊन माता बाल संगोपन कार्डवरती रुग्णवाहिकेचे १०८ व १०२ नंबर तसेच आशा सेविकेचा मोबाईल क्रमांक देण्यात आला होता. गरोदर मातेच्या सर्व चाचण्या, सोनोग्राफी महापालिकेमार्फत निःशुल्क करून देण्यात आल्या होत्या. परंतु, सदर गरोदर मातेस दिलेल्या तारखेआधीच प्रसूती वेदना सुरू झाल्या व त्यांना खासगी डॉक्टरांनी १०८ क्रमांवर संपर्क साधून उपजिल्हा रुग्णालय येथे जाण्याचे सुचवले.त्यानुसार नातेवाईकांनी १०८ टोल फ्री क्रमांकावरील रुग्णवाहिकेस कळविले. मात्र, पुन्हा १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेचा व रुग्ण नातेवाईक यांच्यामध्ये फोनद्वारे योग्य तो संपर्क झाला नाही. तसेच नातेवाईकाने १०२, उपजिल्हा रुग्णालय, महानगरपालिकेच्या रुग्णावाहिकेसाठी कोणताही संपर्क साधला नाही. तोपर्यंत पान २ वर

# वनखात्याच्या जागेवर हॉटेलधारकांचे अतिक्रमण

|| माथेरानच्या कस्तुरबा रस्त्यावर थाटली हॉटेल

|| वनसमितीच्या पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष



। माथेरान । वार्ताहर ।

ब्रिटिश राजवटीत १८५० मध्ये स्थापन झालेल्या टुमदार अशा माथेरान पर्यटनस्थळी रस्त्यालगत असणारी मुबलक जागा वनखात्याच्या अखत्यारीत येत आहे. परंतु, या जागांवर हॉटेलधारकांनी अतिक्रमणे करून जागा व्यापलेल्या आहेत. त्यामुळे या रस्त्यांना मोकळा श्वास मिळणे आता कठीण बनले आहे.

मुख्य रस्त्यावरसुध्दा बहुतांश ठिकाणी वनखात्याच्या जागेवर हॉटेलधारकांनी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या आशीर्वादाने त्यांना चिरीमिरी देऊन कब्जा केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. जवळजवळ स्वतःच्या ताब्यात घेतल्याप्रमाणेच त्या जागांचे सुशोभिकरण करून हॉटेलमधील पर्यटकांना बसण्यासाठी त्याचप्रमाणे लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी लावून अतिक्रमणे केलेली आहेत. त्यातच ब्रिटिश कालखंडात याठिकाणी ३८ पॉईंट्स असताना काही व्यावसायिकांनी स्वतःच्या फायद्यासाठी काही मोकळ्या जागेवरील रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या डोंगर दऱ्यांना नवनवीन नावे देऊन स्वतःच्या मर्जीने पॉईंट बनवून पर्यटकांची दिशाभूल करून या स्थळाची प्रतिमा मलीन करण्यासाठी पुरेपूर प्रयत्न काही वर्षांपासून सुरू आहे. अशा नवीन बनविण्यात आलेल्या पॉईंट्सवर टपऱ्या लावून त्या त्या ठिकाणी झाडांची कत्तल होत असल्याने काही वर्षातच हे स्थळ माथेरानऐवजी मोकळे रान म्हणून प्रसिद्धी मिळवेल, अशी भीती स्थानिक भूमीपुत्रांना वाटत आहे.

कस्तुरबा रोडवरील खान हॉटेलपर्यंत आणि त्यापुढेही हॉटेलधारकांनी रस्त्याच्या बाजूला स्वतः कंपाऊंड बनवून जागा व्यापलेल्या आहेत. निदान वनखात्याच्या वरिष्ठांनी याठिकाणी भेट देऊन आपल्या जागा ताब्यात घेणे गरजेचे आहे परंतु याकडे या खात्याने आणि आपला पाच वर्षांचा कालावधी संपला असतानादेखील नगरपरिषदेच्या निवडणुका झाल्या नसल्याने एकप्रकारे तीन वर्षे बोनस म्हणून कार्यरत असलेल्या गावाची उत्तम सेवा करणाऱ्या वनसमितीच्या पदाधिकाऱ्यांनीसुद्धा पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे की काय, असा प्रश्नसुद्धा स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे. याबाबत वनखात्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.

# आनंद मोकल यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेकापचे नेते जयंत पाटील यांचे स्नेही, अलिबाग अर्बन बँकेचे माजी संचालक तसेच हॉटेल व्यावसायिक आनंद विठोबा मोकल यांचा ८० वा वाढदिवस अलिबागमध्ये शुक्रवारी सायंकाळी उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी बांधकाम व्यावसायिक मुकुंद म्हात्रे आदी राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंद मोकल हे आनंद विहार हॉटेलचे मालक असून, त्यांनी राजकीय, सहकार, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना हॉटेल व्यावसायिक म्हणूनदेखील स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. अलिबाग तालुक्यातील चेंढरे येथील भाग्य लक्ष्मी सभागृहात त्यांचा ८० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी घरातील महिलावर्गाकडून ८० दिव्यांची ओवाळणी करून त्यांचे औक्षण करण्यात आले.

## ठाकरे गटात पक्षप्रवेश

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रा.पं.मधील ताडवाडी आणि वारे ग्रा.पं.मधील पोही येथील आदिवासी कार्यकर्त्यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.हा पक्षप्रवेश सोहळा शिवसेनेचे दिनेश भोईर आणि रामदास ठोंबरे यांच्या माध्यमातून झाला. यावेळी उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, संघटक बाबू घारे, संपर्कप्रमुख भिवसेन बडेकर, महिला तालुका संघटिका करुणा बडेकर, माजी तालुका प्रमुख राजाराम शेळके, कर्जत पंचायत समिती माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, उपतालुका प्रमुख सुरेश गोमारे, बाजीराव दळवी, गणेश मोडक, योगेश भोईर, दिनेश भोईर, रामदास ठोंबरे, माधव भोईर, प्रदीप देशमुख, उपशहार प्रमुख कृष्णा जाधव, योगेश घोलप, आदिवासी समाजाचे नेते मालू निरगुडा आधी प्रमुखांसह मोठ्या संख्येने शिवसैनिक युवासैनिक व आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. तर, ताडवाडीचे नामदेव पादिर, पुंडलिक पादिर, नारायण पादिर, पोहीचे केतन भोईर, भालचंद्र भोईर, चेतन म्हसे, आदी प्रमुखांसह असंख्य महिला कार्यकर्त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला.



## रस्त्याच्या दुतर्फा गवत वाढल्यामुळे अपघाताचा धोका

। पाताळगंगा । वार्ताहर ।

सावरोली-खारपाडा या रस्त्याच्या बाजूला वाढलेले गवत अपघाताला निमंत्रण देत आहे. मात्र, पावसाळा जवळ जवळ संपत आला असूनसुद्धा रस्त्याच्या बाजूला वाढलेले गवताची छाटणी झाली नसल्यामुळे सदर या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून नाराजीचा सूर उमटत आहे.

तालुक्यातील असलेल्या बहुतेक रस्त्यावर वाढलेले गवत मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळत आहे. काही ठिकाणी वाढलेले गवत सात ते आठ फूट वाढले असल्यामुळे समोरील येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नसल्यामुळे अपघातांची समस्या गंभीर बनत आहे. मात्र, असे असले तरीसुद्धा अपघात झाल्यावर संबंधित या रस्त्याच्या अधिकाऱ्यांना जाग येईल का, असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे.

तालुक्यातील काही रस्त्यांची तर दुरवस्था आहेच. मात्र, वाढलेले गवत त्यामध्ये अणखीन भर पडत आहे. काही वळणार गवत खूप वाढले असून, रस्त्याच्या बाजूला झुकलेले पहावयास मिळत आहे. यामुळे वाहनचालकांस धोका निर्माण होऊ शकतो. मात्र, या रस्त्याच्या दुर्तफा वाढलेले हे गवत अपघाताला निमंत्रण देत आहे.

## नथुराम सुर्वे यांचे निधन



**। कर्जत । प्रतिनिधी ।** तालुक्यातील आवळस गावचे रहिवासी नथुराम मोतीराम सुर्वे यांचे ७९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. माजी सरपंच ॲड. प्रमोद सुर्वे व पंचायत समितीचे गट समन्वयक आणि विषय साधन व्यक्ती प्रदीप सुर्वे यांचे ते पिताश्री होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## रवींद्र पाटील यांचे निधन



**। वाघ्रण । वार्ताहर ।** अलिबाग तालुक्यातील पेढांबे येथील रहिवासी वाघ्रण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आत्माराम चिंधू पाटील यांचे चिरंजीव रवींद्र आत्माराम पाटील यांचे निधन मंगळवार, दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारस झाले. निधनसमयी ते वाघ्रण येथे जावई विलास सुभाष पाटील यांच्या निवासस्थानी होते. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर मौजे पेढांबे गणपती पाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांची मुलगी स्नेहा पाटील यांनी त्यांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यावेळी पंचक्रोशितील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या मागे पत्नी रजनी पाटील, मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# शिल्पांची जबाबदारी नगरपरिषदेची नाही

मुख्याधिकारी विराज लबडेंचे स्पष्टीकरण



। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन समुद्रकिनारी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ अशी खेकडा, मासा आदी सुंदर शिल्पे तयार करण्यात आली आहे. ही शिल्पे पर्यटकांचे आकर्षण ठरली आहेत. परंतु, या शिल्पांच्या देखभालीची जबाबदारी शिल्पे बनविणाऱ्या जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सची असल्याचे स्पष्टीकरण मुख्याधिकारी विराज लबडे यांनी दिले आहे.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर आकर्षक लाईट, ॲम्पी थिएटर, वेगवेगळ्या प्रकारची शिल्पे, रंगीबेरंगी झाडे, सेल्फी पॉईंट, सीसीटीव्ही कॅमेरे, व्यायामाची साधने, बेंचेस आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सुशोभिकरण प्रकल्पाचे उद्‌घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले होते. तेथे टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ अशी खेकडा, मासा आदी सुंदर शिल्पे पर्यटकांचे आकर्षण ठरली आहेत. परंतु, किनाऱ्यावरील वरील शिल्पांना पाऊस, खारी हवा आदीमुळे गंज पकडत चालला आहे. म्हणून नगरपरिषदेने त्याकडे लक्ष देऊन त्यास रेड ऑक्साईड, रंग वा काहीतरी गंजरोधक लावून त्यांचे आयुष्य वाढवावे, अशी बातमी नुकतीच प्रसिद्ध झाली होती. याबाबत श्रीवर्धन नगर परिषदेशी संपर्क केला असता, ही शिल्पे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स या संस्थेने बनविली असून, त्यांच्या देखभालीची जबाबदारीही त्यांचीच असून, श्रीवर्धन नगर परिषदेची नाही, असा खुलासा नगरपरिषदेने केला आहे.

> **"श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरील खेकडा, मासा आदी शिल्पे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सने बनविली असून, त्यांची देखभाल नगरपरिषदेकडे नसून जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सकडेच आहे. त्यांना देखभालीबाबत कळविण्यातही आले आहे."**
> **- विराज लबडे, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद**

## साधना म्हात्रे यांना पुत्रवियोग



**। चिरनेर । प्रतिनिधी ।** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील विराज काशिनाथ म्हात्रे (२७) या उच्चशिक्षित तरुणाचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले आहे. त्याच्या या आकस्मिक निधनामुळे चिरनेर कातळपाडा गावावर शोककळा पसरली असून, उरण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत त्याच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचा दशक्रिया विधी बुधवार, दि. १८ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर, उत्तरकार्य विधी शुक्रवार, दि. २० सप्टेंबर रोजी चिरनेर कातळपाडा येथील राहत्या घरी दुपारी ठीक बारा वाजता होणार असल्याची माहिती म्हात्रे कुटुंबियांतर्फे देण्यात आली.

# रिलायन्स टाऊनशीपमध्ये चोरी

## सोन्याच्या दागिन्यांसह लाखोंचा ऐवज लंपास

। रसायनी । वार्ताहर ।

लोधिवली येथील रिलायन्स टाऊनशिपमधील दोन घरांमध्ये लाखो रूपयांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. लोधिवली रिलायन्स टाऊनशिपमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षारक्षक तैनात असतानाही एवढी मोठी चोरी कशी झाली, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, लोधिवली येथील रिलायन्स टाऊनशिपमध्ये सेक्टर बीमध्ये राहणारे जनार्दन श्रावण पाटील व विनय सिंग हे गणपती सणानिमित्त गावाला गेले असता अज्ञात चोरट्यांनी जनार्दन पाटील यांच्या घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील लॉकर तोडून साडेपाच लाख रूपये रोख व सोन्याचे दागिने असा ऐवज लंपास केला. तर, त्यांच्या शेजारी राहणाऱ्या विनय सिंग यांच्या घरातील कपाट फोडून कपाटातील लाखो रूपयांची रोकड आणि सोन्याचे दागिने लंपास केले. याबाबतीत जनार्दन पाटील आणि विनय सिंग यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष मोरे हे अधिक तपास करीत आहेत.

# धारवली विभागातील शेकापचे कार्यकर्ते ठाम : चांदे

## पुस्तक प्रकाशन व गणेश घाट लोकार्पणाचा कार्यक्रम

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मूळ शेतकरी कामगार पक्ष कधीही फुटत नसतो. कार्यकर्त्यांची नाळ शेकापच्या डाव्या विचारांसोबत जुळलेली असल्यामुळे जे अलीकडेच शेकापमध्ये आले त्यांनी विचारधनापेक्षा ठेकेदारीच्या माध्यमातून धन कमविण्यासाठी दुसऱ्या पक्षामध्ये जाण्याची भूमिका घेतली तरी धारवली विभागातील शेकापचे कार्यकर्ते ठामच असल्याचा दावा तालुका चिटणीस वैभव चांदे यांनी केला.



धारवली विभागातील डॉ. आशिष जैतपाल यांच्या 'निबंधकोश-विचार विमर्श' पुस्तकाचे प्रकाशन तसेच कुळेवाडी येथील श्रीगणेश विसर्जनकरिता श्रीगणेश घाटाचे लोकार्पण आदी कार्यक्रम शेकाप कार्यकर्त्यांच्या इच्छेने आयोजित करण्यात आले असता वैभव चांदे यांनी हा दावा केला. पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच शेतकरी कामगार पक्षाचे महाड विधानसभा चिटणीस एकनाथ गायकवाड, तालुका चिटणीस वैभव चांदे, धारवली सरपंच विलास सकपाळ, मनोहर पार्टे, धारवली मुंबई मंडळाचे अध्यक्ष पवार, पळचिल हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय जैतपाल आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. धारवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील कुळेवाडी येथील श्रीगणेश विसर्जनाकरिता कुळेवाडी येथील ग्रामस्थांच्या मागणीनुसार शेकापच्यावतीने श्रीगणेश घाट बांधून देण्यात आला. त्याचे लोकार्पण सरपंच विलास सकपाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकापचे मनोहर पार्टे, मुराद तांबे, समीर चिपळूणकर, अमजद करबेलकर, संजय महाडिक, प्रमोद महाडीक, शैलेश सुतार, भगवान सकपाळ व स्थानिक कार्यकर्ते तसेच कुळेवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### आमदारांच्या गावात ना नल, ना जल

मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील आमदारांच्या थळ या गावात १०० टक्के नळजोडणी झाली असल्याचे सरकारचेच म्हणणे आहे. गावात १८२७ घरे असून ११ सप्टेंबरपर्यंत १०० टक्के जोडणी झाली असल्याचे जलजीवन मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावर म्हटले आहे. मात्र प्रत्यक्षात गावात पाहणी केली असता ही नळजोडणी जलजीवन मिशन अंतर्गत नसून ग्रामस्थांनी स्वःखर्चाने आरसीएफ प्रशासनाकडून घेतली असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नेमका काय सर्व्हे केला, यावर प्रश्न उपस्थित होत आहे. परिणामी, योजनेसाठी झालेला खर्च, प्रत्यक्षात झालेली कामे, सुरु न झालेली कामे याचा विचार न करता कागदोपत्री बिले रंगविण्याचे कामही सुरु असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

थळमधील परिस्थिती पाहता जलजीवन मिशन या योजनेत ग्रामस्थांची नाही तर अधिकारी, नेते मंडळींनी आपली तहान भागविली असल्याचा आरोप थळमधील ग्रामस्थ रुबीन साखरकर यांनी केला आहे. याशिवाय वरिष्ठ अधिकारी आणि ठेकेदार यांची मिलीभगत असल्याने या योजनेचा बोऱ्या वाजला असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**पाण्याच्या टाकीत खडखडाट**

**थळ बाजारात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जवळपास आठ ते दहा वर्षापूर्वी ३ पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या होत्या. त्यावर केलेला खर्च पाण्यात गेला असून त्या टाक्यांमध्ये थेंबभर पाणीदेखील नसल्याची वस्तूस्थिती आहे.**

**...आता दांडकाच काढणार**

**थळ बाजारात गेली कित्येक वर्षे पाण्याची समस्या आहे. मोर्चे, आंदोलने काढली तरीही ग्रामपंचायत पाणी देण्यास असमर्थ ठरली. आमदारांसह ग्रामपंचायत प्रशासनाने चुना लावण्याचे काम केले आहे. ऐन गणपतीत दारात चिखल होत असून दिवसभर तो काढावा लागत आहे. फक्त मतांसाठी आमदार फिरत असेल तर येत्या निवडणूकीत दांडकाच काढणार, असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.**

**थळमध्ये आरसीएफ कंपनीच्या माध्यमातून नळ पाणी पुरवठा करण्यात आला आहे. एमआयडीसीद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. तसेच स्वतः खर्च करून नळ कनेक्शन घेतले आहे. मात्र या नळांना पाणीच नाही. पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. हर घर जल योजनेचा काहीच लाभ मिळाला नाही.**

**- अकबर कुरेशी, ग्रामस्थ**

**थळ पालथीमध्ये आरसीएफ कडूनच पाणी दिले जाते. घरांमध्ये नळ नाहीत. आरसीएफची लाईन पंचायतने वळवली आहे. जलजीवन व हरघर योजनेमधून पाणीच नाहीत.**

**- रविंद्र म्हात्रे, ग्रामस्थ**

### रेल्वे प्रशासनाकडून 'मराठी'वर अन्याय

भाषेत आरक्षण फॉर्म का नाही, अशी विचारणा केली असता कर्जत रेल्वे स्टेशन प्रबंधक प्रभाष कुमार लाल यांनी उद्धट भाषेत उत्तर दिले. मागील काही दिवसांपासून कर्जत रेल्वे स्थानकात गुजराती भाषेत रेल्वे आरक्षण फॉर्म दिले जात असल्याने मराठी भाषिक नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

कर्जत रेल्वे स्टेशन मास्तर यांनी महिला प्रवाशांसोबत वापरलेली भाषा निंदनीय व निषेधार्ह आहे, अशी भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतली आहे. याबाबत रेल्वे विभागाचे कमर्शियल निरीक्षक शिरीष कांबळे यांना संपर्क करुन ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यांनी मराठी भाषेतील आरक्षण फॉर्मची कमतरता असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून गुजराती भाषेतील आरक्षण फॉर्म उपलब्ध केले असल्याचा खुलासा केला. मात्र, तात्काळ मराठी भाषेतील आरक्षण फॉर्म उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन दिले. मराठी राजभाषेचा अवमान कर्जत रेल्वे स्थानक प्रबंधक लाल यांच्याकडून सुरू आहे. त्यामुळे मनसेचा हिसका दाखवावा लागेल, असा इशारा मनसेचे जिल्हा अध्यक्ष आणि मनसे रेल्वे युनियनचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी दिला आहे.

### प्रिया नाईक यांची हत्या, दोघे जण ताब्यात

पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. सदरचा प्रकार हा संशयास्पद वाटत असल्याने पोलिसांनी आय-बाईक, अंगुली मुद्रातज्ज्ञ, श्वानपथक, न्यायवैद्यकीय सहाय्यक पथक यांना पाचारण केले व घटनास्थळाची पाहणी केली. प्रिया नाईक त्यांच्या घरी असताना कोणत्यातरी दोरी किंवा वायरसदृश्य वस्तूने गळा अळून अज्ञाताने त्यांची हत्या केली. त्यानंतर त्यांच्या घराचा दरवाजा ओढून आरोपी पळून गेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ सप्टेंबर रोजी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. प्रिया नाईक यांची हत्या कोणी केली आणि कशासाठी केली, हे गुलदस्त्यात आहे. पनवेल शहर पोलिसांनी यातील दोन आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### श्रेय घ्या, पण तालुक्याचे प्रश्नही मार्गी लावा

विकास आघाडीला कोणत्याही निवडणुका लढवायच्या नाहीत. त्यामुळे आम्हाला श्रेय घ्यायचेच नाही. जनतेला सुविधा मिळवून द्यायचा आहेत, असे टिळक आणि तळकर म्हणाले.

दिल्लीपासून गल्लीपर्यंत सत्ता असताना, शासन यंत्रणा बरोबर असताना जनतेला वेठीस धरून त्यांनी तळा तालुक्याला वाऱ्यावर का सोडले, असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे. जनतेच्या प्रश्नांवर तळा तालुका विकास आघाडी यापुढेही लोकशाही मार्गाने आंदोलने करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### सरकारकडून सत्तेचा गैरवापर

की, शिंदखेडा हा कष्टकरी शेतकरी यांचा परिसर आहे. शेतीमध्ये इमान राखून कष्ट करायचे. त्यावर आपला संसार चालवण्याचे काम या तालुक्यातील जनता करते. पण, अलीकडच्या काळात राज्यकर्ते शेतीसंबंधात आस्था ठेवत नाही. सरकारची अनेक धोरणे ही शेतकरी हिताची नाहीत. कांदा हे शेतकऱ्याचे महत्त्वाचे पीक आहे. तर सामान्य जनतेचे खाद्यदेखील आहे. परंतु, मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी कांद्याच्या संदर्भात चुकीची धोरणे राबवली. शेतकऱ्यांनी पिकवलेला कांद्याला अपेक्षित भाव मिळावा, ही त्यांची रास्त मागणी आहे. पण सरकारने निर्यात बंदी करून शेतकऱ्यांना अडचणीत आणले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनादेखील अशाच पद्धतीने अडचणीत आणण्याचे काम सरकारने केले आहे. त्याचप्रमाणे गहू आणि तांदूळ या उत्पादनासंदर्भातदेखील शेतकरी हिताच्या विरोधात धोरणे घेतली. शेतकरी हा पिकवता धनी आहे. मात्र, त्याच्या पिकाला किंमतच मिळू द्यायची नाही, हे मोदी सरकारचे धोरण आहे. हे सरकार बळीराजाच्या विरोधात आहे. आपणदेखील दहा वर्ष देशाचे शेतीचा कारभार पाहिला. कृषी मंत्रीपदाची जबाबदारी असताना अमेरिकेतला गहू भारतात आणण्याचा विषय माझ्यासमोर आला. त्यामुळे मला दुःख झाले. मी शेतकरी परिवारातला आहे. हा देश बळीराजाचा देश आहे. या देशात परदेशातून अन्न आणावे लागते, ही बाब मनाला पटत नव्हती. पण हे आव्हान स्वीकारले. आम्ही गहू, तांदळाला दाम दिला. तसेच शेतकऱ्यांची संदर्भात योग्य धोरण राबवले. त्यामुळे २०१४ मध्ये भारत हा जगात गहू निर्यात करणारा दोन नंबरचा देश झाला. हे सर्व बळीराजाच्या साथीमुळेच शक्य होऊ शकले. याच कालावधीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भात आपण सरकारच्या माध्यमातून निर्णय घेतले. शेतकऱ्यांवर ७१ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. हे कर्ज सावकाराच्या कर्जामुळे होते. ही बाब निदर्शनास आल्यानेच आपण कर्जमाफी केली. असे करत असताना वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना देखील आपण सवलत देण्याचे काम केले. पण सध्याचे सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधात धोरण राबवत आहे, असा आरोप शरद पवार यांनी यावेळी केला.

### रुग्णवाहिकेसाठी टोल फ्री नंबर

उशीर होत असल्याने नातेवाईकांनी उपलब्ध वाहनातून रुग्णास उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे प्रसूतीसाठी दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची नैसर्गिक प्रसूती होऊन बाळास जन्म दिला. दि. १२ सप्टेंबर रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज देऊन घरी मातेस घरी सोडण्यात आले.

रुग्णसेवेसाठी पनवेल महानगरपालिका नेहमीच कटिबद्ध असून, इतर रुग्णांसाठीच्या संदर्भ सेवेसाठीदेखील लवकरात लवकर ठराव घेऊन रुग्णवाहिका उपलब्ध करण्याबाबत आयुक्तांनी संबंधित विभागास सूचित केले आहे.

**नि:शुल्क रुग्णवाहिका सेवा**

१. डॉ. रेहाना मुजावर,
माता बाल संगोपन अधिकारी ९३७२८८७१२३०
२. वाहन चालकचे नाव : नरेंद्र सोनवणे
७०२१५७२९१६, वेळ सकाळी ७ ते रात्री ७
३. वाहन चालकचे नाव : धर्मा गवळी
९५९४७४६५२७, वेळ रात्री ७ ते सकाळी ७

# कोलमांडले शाळा तालुक्यात प्रथम



। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत वर्ष २०२४-२५ राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात कोलमांडाला मराठी शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शैक्षणिक वर्षात २०२३-२४ पासून राबविलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानांतर्गत शैक्षणिक वर्षात २०२४-२५ अभियान अतिशय प्रभावीपणे व स्पर्धात्मक पद्धतीने राबविण्यात आले. या अभियानात यावर्षी नवनवीन उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. अभियानात रायगड जिल्हा परिषद शाळा कोलमांडले मराठी शाळेने प्रथमच सहभाग घेऊन मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ अभियानांतर्गत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला.

याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शाळा समिती, पालक ग्रामस्थ व सर्व विद्यार्थी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र शासनाने शिक्षण विभागांतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळा शिक्षण विभागांतर्गत व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांत प्रभावीपणे राबविण्याचे ठरवले आहे. या अभियानांतर्गत शाळेचे तीन घटकांमध्ये मूल्यांकन करण्यात आले.

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४




● कु प्रथमेश दत्ताराम पाटील मु.दिवीपारंगी ता.अलिबाग रायगड चलचित्र देखावा २०२४ (भारत देशातील वाढती महागाई) (छायाचित्र : समीर मालोदे)



● वसंत धर्मा घरत, खंडाळकर आळी, वरसोली तालुका अलिबाग रायगड यांचे निवासी श्री गणेशाची आकर्षक सजावट.



● (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

मांडवा पोलीस निरीक्षक श्री. भोई साहेब व त्यांचे सहकारी पोलीस अमित पाटील किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित असताना.



● मुरुड तालुक्यातील आगरदांडा येथील व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते सुप्रेश खोत यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● श्री. एस. के. पाटील, लोणारे-मानी फाटा, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणराज. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● सारळ, ता. अलिबाग येथील श्री.सुभाष म्हात्रे, अभय म्हात्रे, निमिष म्हात्रे यांच्या निवासस्थानी एकत्रित कुटुंबातील विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड.



● (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

● श्री. करमेळे परिवार, सातिर्जे-कातळपाडा, अलिबाग यांच्या कुटुंबातील विराजमान गणपती बाप्पा.




● को.ए.सो नाना पाटील हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.शशिकांत कमलाकर पाटील यांच्या घरी विराजमान झालेली गणेशमूर्ती.(पेझारी-आंबेपुर)



● मंगेश पाटील, बेलकडे यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बाप्पा.



● उरण पोलीस स्टेशनच्या गणपतीचे दर्शन घेताना पोलीस ठाणेचे अंमलदार सचिन पाटील व इतर पोलीस अधिकारी (छायाचित्र : मोहन माळी)



● मुरुड तालुका पंचायत समितीचे माजी सभापती चंद्रकांत कमाने मजगांव येथील आपल्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छायाचित्र :राजीव नेवासेकर)

# बुद्धिस्ट सोसायटी वाचवली




## डॉ. राजरत्न आंबेडकर यांची माहिती

**। नेरळ । वार्ताहर ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या जागतिक परिषदेचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील (आरएसएस) काही लोक करत होती. हे मला दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष झाल्यावर लक्षात आले. परंतु, त्यांचा बुद्धिस्ट सोसायटी गिळंकृत करण्याचा प्रयत्न हाणून पाडला आहे. आता यावर्षी जागतिक परिषदेत केवळ राजरत्न आंबेडकर यांनाच या परिषदेचे निमंत्रण आले आहे, अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी कर्जत येथील सभेत दिली.

कर्जत येथील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत. भारतीय बौद्ध सभा ही आपली मातृ संस्था आहे. ही संस्था आरएसएसची लोक चालवत होते. जोतिंबर नावाच्या इसमाने भारतीय बौद्ध सभेला गिळंकृत करण्याचा प्रयत्न सुरू केला होता आणि २०१५ मध्ये मी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया संस्था ताब्यात घेतली. त्यावेळी शेंडी वाल्यांची कारस्थाने समजून आणि नंतर उधळून लावण्यासाठी प्रयत्न केले, असे राजरत्न म्हणाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी परदेशात असताना बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना केली होती. २०१५ मध्ये मी ही संस्था ताब्यात घेतल्यावर परदेशात २०१८ मध्ये जगातील बुद्धिस्ट परिषदेला गेलो. त्यावेळी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे प्रतिनिधित्व त्रिपाठी, कुलकर्णी, देशपांडे करीत असल्याचे दिसून आले होते. सर्व प्रथम जगातील पातळीवर त्या ब्राम्हणांचे वर्चस्व मी मोडीत काढले. यावर्षी तर केवळ डॉ.राजरत्न आंबेडकर या एकाच व्यक्तीला त्या जागतिक परिषदेत बोलावले आहे. त्याच माध्यमातून बुद्धिस्ट सोसायटीचे माध्यमातून ब्राह्मणांचे वर्चस्व बाजूला केले, असे ते म्हणाले.

स्वतः:ला दलितांचा नेता म्हणणारे पैसे घेवुन लोक जम वतात आणि त्यामुळे त्यांनी पक्ष चालविण्याचे बंद करावेत, असे आवाहन राजरत्न यांनी केले. वरीष्ठ नेता हा आमच्या समाजाला विकण्याचे काम करीत असल्याने आपण अजूनही रांजले-गांजलेले राहिलो आहोत.

नवी मुंबई महिला जिल्हा अध्यक्ष रमा पंडित-गायकवाड यांनी राजरत्न आंबेडकर या सारख्या नेत्याला दिल्लीत पाठवावेच लागेल, असे मत मांडले. त्यासाठी सर्व बहिणी राजरत्न आंबेडकर यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या बहिणी असून पैसे घेणाऱ्या बहिणी नाहीत. तर रक्ताच्या बहिणी आहेत, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

आमचा खंबीर नेता आम्हाला सापडला असून शिंदे यांना त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे, असे ठाम मत विद्या गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मेळाव्याचे आयोजक जगदीश गायकवाड, अशोक गोतारणे, विद्या गायकवाड, प्रकाश गायकवाड, दिलीप गायकवाड, नरेश गायकवाड, पंकज सोनावणे, नितेश यादव आदी मान्यवर मान्यवर उपस्थित होते.

# लोकलच्या धडकेने एकाचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

अज्ञात लोकलच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

सदर इसम हा मुस्लीम समाजाचा असून वय अंदाजे ३० वर्षे, उंची ५ फुट ५ इंच, अंगाने मध्यम, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व वाढलेले, दाढी साधारण काळी, नाक सरळ, चेहरा गोल आहे. मानेच्या उजव्या बाजूस उर्दु भाषेत गोंदलेले आहे. अंगात फुल बाह्याचा काळ्या रंगाचा त्यावर सफेद फुलाची डिझाईन असलेला शर्ट व निळ्या रंगाची फुल जिन्स पॅन्ट व आतमध्ये राखाडी रंगाची अंडरवेअर घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.




## रोडपाली राजाच्या देखाव्यातून समाजातील पुरुषी विकृतीवर ठेवले बोट...

# महिलांवरील अत्याचार थांबणार कधी?

**। पनवेल । वार्ताहर ।**

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. उरण, शीळ आणि त्यानंतर बदलापूर या ठिकाणी घडलेल्या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरून गेले आहे. यामुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवात या प्रश्नावर बोट ठेवत रोडपालीच्या राजासमोर महिलांवरील अत्याचार थांबणार कधी? असा सवाल पोस्टरद्वारे उपस्थित करणारा देखावा उभारण्यात आला आहे. यातून गणेश भक्तांसह समाजाला विचार करण्यास भाग पाडले आहे.

महिला आणि मुलींवरील हिंसाचार हा जगातील सर्वात प्रचलित आणि व्यापक मानवी हक्क उल्लंघनांपैकी एक आहे. महिला आणि मुलींवरील हिंसाचाराचा प्रतिकार करण्यासाठी राष्ट्रे किती वचनबद्ध आहेत याची आकडेवारी स्पष्टपणे विरळ आहे.

महिला सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अनेक कायदे करण्यात आले आहेत. भविष्यातही कठोर कलम आणले जातील. त्यानुसार गुन्हेगारांना शिक्षा सुद्धा होईल. असे असले तरी महिलांवरील अत्याचार थांबतील का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. आजही आपल्याकडे कायदे आहेत. मात्र असे प्रकार कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहेत. समाजामध्ये विकृत प्रवृत्ती वाढल्याचे दिसून येत आहे. उरण या ठिकाणी एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करून तिची क्रूरपणे हत्या करण्यात आली. शिळ या ठिकाणी मंदिरातच पुजारीच भक्षक ठरले आणि त्या ठिकाणी आलेल्या एका भगिनीवर पाशवी अत्याचार करून तिचा खून करण्यात आला. बदलापूर या ठिकाणी चिमुकल्या मुलींवर ओढवलेल्या प्रसंगाने संपूर्ण महाराष्ट्र हादरले. या सर्व पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी आंदोलने मोर्चा काढण्यात आले. त्याचे पडसाद सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवावर सुद्धा पडले. एकता सामाजिक सेवा संस्थेच्या रोडपालीचा राजा या बाप्पांसमोर चंद्रकांत राऊत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महिलांवरील अत्याचार थांबणार कधी या शीर्षकाखाली पोस्टरच्या माध्यमातून देखावा उभारला आहे.

### मानसिकतेत बदल हवा!

पुरुषाला जन्मदाती आई, बहिण, पत्नी त्याचबरोबर मुलगी असते. त्या सुरक्षित असाव्यात असे संबंधितांना मनोमन वाटते. मग दुसऱ्याच्या आई, बहिणीवर अत्याचार करण्यासाठी हृदय का धजावतं हा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. हा निर्दयी आणि क्रूर विचार मनात येतोच कसा हा सवाल स्वतः:च्या मनाला विचारायला हवा. जोपर्यंत परस्त्री मातेसमान असा विचार प्रत्येक हृदय आणि मनामध्ये घर करून राहत नाही. तोपर्यंत अशा घटनांना आळा बसणार नाही. कायदे तर कडक झाले पाहिजेत. गुन्हेगारांना कठोर शिक्षा करतानाच समाजातील प्रत्येक पुरुषी मानसिकतेमध्ये बदल झाला पाहीजे.

### वेदनांच्या पल्याड!

२१ व्या शतकामध्ये वावरत असताना प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांनी स्वतः:चे कर्तृत्व सिद्ध केले आहे. याउलट काही ठिकाणी चार पावले पुढे टाकली आहेत. असे असताना सुद्धा स्त्री-पुरुष समानता फक्त कागदावरच असल्याचे अनेकदा दिसून येते. पुरुषी मानसिकता बदलली नाही. परिणामी गेल्या अनेक वर्षांपासून लैंगिक अत्याचारांबरोबरच दुय्यम वागणूक, अनेक गोष्टींच्या विरोधात सावित्रीच्या लेकी संघर्ष करीत आहेत. दररोज घडणाऱ्या घटनांमुळे तिच्या वेदना सहनशीलतेच्या पल्याड गेल्या आहेत. हा तिचा आर्त टाहु फलकांवर मांडण्यात आला आहे. ते पाहून अनेकांच्या डोळ्यात पाणी आल्याचे दिसून आले.

# पोपट आणि मालक

अरविंद केजरीवाल यांना आज ना उद्या जामीन मिळणार होताच. पण तो देताना सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय म्हणजेच केंद्रीय गुप्तचर यंत्रणेवर जे ताशेरे मारले आहेत ते मोदी सरकारच्या अब्रूची लक्तरे काढणारे आहेत. केजरीवाल यांच्याविरुध्द तुरुंगात खितपत ठेवण्यामागे सीबीआयचा कुटील हेतू आहे असा न्यायालयाचा अभिप्राय आहे. २०१३ मध्ये कोळसा घोटाळ्याची सुनावणी करताना तेव्हाच्या सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयचे वर्णन पिंजऱ्यातला पोपट असे केले होते. केंद्र सरकारच्या इच्छेनुसार हा पोपट बोलतो असे न्यायालयाचे म्हणणे होते. केजरीवाल प्रकरणात सुनावणी करणाऱ्या न्यायमूर्ती भूयान यांनी आपल्या निकालपत्रात त्याची पुन्हा आठवण करून दिली. सीबीआयने पिंजऱ्यातील पोपट ही आपली प्रतिमा बदलायला हवी असे भूयान यांनी बजावले. २०१३ मध्ये ही चपराक मनमोहनसिंग सरकारसाठी होती. तशी आजची चपराक थेटपणे मोदी व गृहमंत्री शाह यांना आहे. २०१४ मध्ये भाजपने आपल्या प्रचारात त्या टिपण्णीचा पुरेपूर फायदा उठवला होता. फार काय, अगदी अलिकडे लोकसभेत केलेल्या एका भाषणात नरेंद्र मोदी यांनी न्यायमूर्तींच्या तेव्हाच्या उद्गारांची मुद्दाम आठवण काढली होती. मग आता न्यायालयाच्या फटकाऱ्यांवर मोदींचे काय म्हणणे आहे? कारण, सीबीआय जर अजूनही पिंजऱ्यातला पोपट असेल तर त्याचे मालक हे मोदी आहेत. एरवी सगळ्या जगाला शहाणपणा शिकवणाऱ्या मोदींनी याबाबत स्पष्टीकरण द्यायला हवे. अर्थात, सत्तातुराणां न भयं न लज्जा या न्यायाने भाजपला सत्तेची इतकी धुंदी आहे की त्यांना आता असल्या ताशेऱ्यांची भीती किंवा लाज-शरम वाटेनाशी झाली आहे. मोदी असले काही प्रसंग आले की दडी मारून बसतात हे गेली दहा वर्षे आपण पाहतो आहोतच. मणिपूर गेली सोळा महिने जळत असूनही त्याविषयी ते चकार शब्द काढायला तयार नाहीत हे सर्वांसमोर आहे. त्यामुळे ते काही बोललेच तर न्यायालयच कसे पूर्वग्रहदूषित आहे वगैरे बोलू शकतील. गेल्या निवडणूक प्रचारात राजस्थानमध्ये त्यांनी तशी वक्तव्ये केली होती.

### निगरगट्ट भाजप

पण मोदी बोलले नसले तरी भाजपचे प्रवक्ते मात्र याबाबत बोलले आहेत. सीबीआय पिंजऱ्यातला पोपट नसून भ्रष्टाचाऱ्यांची शिकार करणाऱ्या बहिरी ससाण्याप्रमाणे तो काम करीत आहे असा दावा त्यांनी केला. सर्वोच्च न्यायालयालाही मूर्ख ठरवण्याचा हा प्रकार आहे. कितीही पडलो तरी आमचेच नाक वर ही ती वृत्ती आहे. यातूनच लोकसभेला नामुष्की झाली. तरीही भाजपवाले काहीही अक्कल शिकायला तयार नाहीत. दिल्लीतील दारू धोरणात घोटाळा केल्याचे हे सर्व प्रकरण आहे. २०२२ पासून याची चौकशी सुरू आहे. नायब राज्यपालांच्या विरोधामुळे केजरीवाल यांनी हे वादग्रस्त धोरण रद्दबातल करूनही आता एक वर्ष लोटले आहे. या प्रकरणाची बराच काळ नुसतीच चौकशी चालू होती. आम आदमी पक्षाचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, संजय सिंग इत्यादींना तुरुंगात टाकण्यात आले होते. केजरीवाल यांचे मात्र आरोपपत्रात नावही नव्हते. यंदाच्या लोकसभा निवडणुका जवळ येताच मार्च महिन्यात इडीला एकाएकी जाग आली. तिने केजरीवाल यांना अटक केली. मे महिन्यात निवडणुकांच्या प्रचारासाठी न्यायालयाने केजरीवाल यांना हंगामी जामीन दिला. त्यावर भाजपने गहजब केला. प्रचारानंतर केजरीवाल पुन्हा तुरुंगात गेले. निकालांनंतर महिनाभराने १२ जुलै रोजी केजरीवाल यांना त्या प्रकरणात नियमित जामीन मिळाला. मात्र त्याची चाहूल लागताच सीबीआयने त्यांना त्याच प्रकरणात अटक केली. काहीही करून केजरीवाल यांना तुरुंगात सडत ठेवण्याची ही रणनीती होती. न्यायमूर्ती भूयाना यांनी नेमके याच मुद्द्यावर बोट ठेवले आहे. इडी आणि सीबीआय या दोहोंचेही खटले एकाच आरोपासंबंधीचे असून त्यांचे दावे व पुरावेही एकसारखेच आहेत. असे असूनही इडीच्या प्रकरणात जामीन मिळताच सीबीआयने त्यांना अटक करावी हा सरळ सरळ खुनशीपणा होता. राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्र्याबाबत खुलेआम असा प्रकार घडावा यावरून सीबीआयचे मालक किती निर्ढावलेले व निगरगट्ट झाले आहेत हे दिसते.

### आताच सुटका का?

गंमत अशी की सीबीआयने दारु घोटाळ्याच्या चौकशीला बावीस महिन्यांपूर्वी सुरुवात केली. तिच्यात काहीही प्रगती झाली नाही. आणि अचानक केजरीवाल यांना अटक झाली. बावीस महिने तुम्ही काय करीत होतात असा रोकडा सवाल सर्वोच्च न्यायालयाने आता केला आहे. याची समाधानकारक उत्तरे अर्थातच सीबीआयकडे नाहीत. या प्रकरणातील काही आरोपींना परभारे माफीचे साक्षीदार करण्यात आले. त्यांनी बऱ्याच महिन्यांनंतर व बऱ्याच साक्षी बदलून मग केजरीवाल यांचे नाव घेतले. हा पोलिसी कटाचा भाग आहे हे स्पष्टच दिसते. तरीही केजरीवाल यांना सहजी जामीन मिळू शकला नाही. त्यांना खालचे न्यायालय, उच्च न्यायालय अशी सर्व प्रक्रिया करावी लागली. उच्च न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज एक-दोनदा फेटाळला होता. त्याबाबतही सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. फौजदारी गुन्ह्यांमध्ये जामीन द्यायचाच नाही असे खालच्या न्यायालयांची भूमिका अत्यंत गैर आहे असे न्यायमूर्तींनी सुनावले आहे. कहर म्हणजे केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला तर उच्च न्यायालयाच्या मनोधैर्यावर परिणाम होईल अशी सबब सांगून सीबीआयने हा खटला पुन्हा खालच्या न्यायालयात नेण्याची विनंती केली. त्यावर न्यायालयाच्या चक्रात फसवण्याची शिक्षा देणे हा यामागचा हेतू आहे काय अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. दरम्यान, या निर्णयाबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन करत असतानाच जनतेच्या मनात आलेली शंकाही येथे नोंदवायला हवी. येत्या महिन्यात हरियाणात निवडणुका आहेत. तेथे भाजपचा पराभव होणार अशी स्पष्ट लक्षणे आहेत. केजरीवाल सुटल्याने आता आम आदमीच्या प्रचाराला जोर येईल व काँग्रेसची अडचण होईल. त्यासाठीच ही सुटका झाली आहे काय असा उघड सवाल सोशल मिडियातून लोक करीत आहेत. काश्मिरातील रशीद इंजिनियर यांच्या सुटकेवरूनही हाच तर्क केला गेला आहे. अशा शंका का निर्माण होतात याचा आता न्यायालयांनीही विचार करायला हवा.

विचार

# सोने झळाळणार, रोजगार वाढणार

***सरत्या आठवड्यामध्ये सोन्याचे भाव नव्वद हजाराच्या पुढे जाण्याची शक्यता चर्चेत असताना वाहनांचा खप घसरल्याने उद्योग चिंतीत झाल्याचे पहायला मिळाले. 'फ्लिपकार्ट' एक लाख नवीन नोकऱ्या देण्याची तयारी करत असताना 'ॲमेझॉन' देशी उद्योजकांना निर्यातीची संधी देणार असल्याचे वृत्त समोर आले. याच सुमारास फिनटेक, स्टार्टअपमध्ये महिला संचालकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरी सरत्या आठवड्यामध्ये नेहमीप्रमाणेच लगबगीत राहिली. सोन्याचे भाव नव्वद हजाराच्या पुढे जाण्याची शक्यता चर्चेत असताना वाहनांचा खप घसरल्याने उद्योग चिंतीत झाल्याचे पहायला मिळाले. दरम्यान, 'फ्लिपकार्ट' नवीन एक लाख नोकऱ्या देण्याची तयारी करत असताना 'ॲमेझॉन'च्या माध्यमातून देशी उद्योजकांना निर्यातीची संधी मिळणार असल्याचे वृत्त समोर आले. याच सुमारास फिनटेक, स्टार्टअपमध्ये महिला संचालकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे आढळून आले.

सोन्यात गुंतवणूक करण्याचा विचार करणाऱ्यांनी येत्या काळात त्यातून किती परतावा मिळू शकतो हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. परताव्याच्या बाबतीत सोने इतर सर्व मालमत्ता वर्गांपेक्षा नेहमीच चांगले असल्याचे सिद्ध झाले आहे. विशेष म्हणजे शेअर बाजार किंवा मालमत्तेच्या किमती घसरल्या, तरी सोन्याची चमक कायम राहते. यामुळेच अनेक वर्षांपासून सोने हा गुंतवणुकीसाठी लोकांचा आवडता पर्याय राहिला आहे. सध्या सोन्याचा भाव ७१ हजार रुपये प्रति तोळा आहे. काही रिपोर्टसनुसार सोन्याचा भाव लवकरच ७५ हजार ते ऐंशी हजार रुपये प्रति तोळा दरापर्यंत पोहोचू शकतो. एका अहवालात तर आगामी काही महिन्यांमध्ये सोने नव्वद हजार रुपये प्रति तोळा होण्याचा अंदाज आहे. 'बँक ऑफ अमेरिके'च्या अंदाजानुसार २०२५ पर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची किंमत तीन हजार डॉलर प्रति औंसपर्यंत पोहोचू शकेल. या वर्षी सोन्याच्या किमतीत २१ टक्क्यांनी वाढ झाली. आणखी वाढ होण्याचीही शक्यता आहे. सोन्याची किंमत तीन हजार प्रति औंसांवर तर भारतात २४ कॅरेट सोन्याच्या दहा ग्रॅमची किंमत ९० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकते. 'बँक ऑफ अमेरिका'व्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक फर्म 'गोल्डमन सॅक्स'नेही सोन्याबाबत तेजीचा दृष्टिकोन ठेवला आहे. 'गोल्डमन सॅक्स'चा अंदाज आहे की २०२५ च्या सुरुवातीपर्यंत सोन्याच्या किमती २,७०० डॉलर प्रति औंसपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे भारतात सोन्याची किंमत प्रति तोळा ८१ हजार रुपये होऊ शकते.

दरम्यान, देशातील वाहनविक्रीमध्ये घट झाल्याने ऑटोमोबाईल कंपन्यांची चिंता वाढल्याचे पहायला मिळाले. ऑगस्टमध्ये भारतातील प्रवासी वाहनांच्या किरकोळ विक्रीमध्ये वार्षिक पाच टक्क्यांनी घट झाली आहे. 'एफएडीए' (फाडा) या उद्योग संघटनेने ही माहिती दिली. 'फाडा'ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ऑगस्टमध्ये एकूण ३०९,०५३ प्रवासी वाहनांची नोंदणी झाली होती तर ऑगस्ट २०२३ मध्ये ही संख्या ३२३,७२० होती. ग्राहकांच्या खरेदीला होणारा विलंब आणि सततचा मुसळधार पाऊस यांसह खराब ग्राहक प्रतिसादामुळे ऑगस्टमध्ये देशातील कार विक्रीमध्ये घट झाली आहे. 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) चे अध्यक्ष मनीष राज सिंघानिया यांनी म्हटले आहे की सणांचा हंगाम असूनही बाजारपेठेवर खूप दबाव आहे. वाहने आता ७०-७५ दिवस गोदामांमध्ये ठेवली जातात. मूळ उत्पादक (ओईएमएस) मासिक आधारावर डीलर्सना पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंची संख्या वाढवत आहेत. त्यामुळे समस्या आणखी बिकट होत आहे. 'फाडा'ने सर्व बँका आणि बिगरवित्तीय संस्थांना विनंती केली आहे की त्यांनी जास्त स्टॉक ठेवलेल्या डीलर्सना दिलेले वित्त नियंत्रित करावे. आता रोजगाराच्या आघाडीवरील लक्षवेधी बातम्यांची एक झलक. आघाडीची ई-कॉमर्स कंपनी 'फ्लिपकार्ट' आगामी सणासुदीच्या काळात आयोजित 'द बिग बिलियन डेज २०२४' या सेलदरम्यान देशभरात सुमारे एक लाख नवीन रोजगार निर्माण करेल, अशी अपेक्षा आहे. 'फ्लिपकार्ट'ने म्हटले आहे की या उत्सवाच्या विक्रीपूर्वी त्यांनी नऊ शहरांमध्ये ११ नवीन पूर्तता केंद्रे स्थापन केली आहेत. त्यामुळे देशभरात या केंद्रांची संख्या ८३ झाली आहे. 'वॉलमार्ट'ने सांगितले, की 'फ्लिपकार्ट' देशभरात आपल्या पुरवठा साखळीमध्ये एक लाखाहून अधिक नवीन नोकऱ्या निर्माण करणार आहे. या वर्षीच्या सणासुदीच्या हंगामात ऑपरेशनल क्षमता मजबूत करणे आणि आर्थिक वाढीला गती देणे हे तिचे उद्दिष्ट आहे. 'फ्लिपकार्ट'च्या मते, या नवीन नोकऱ्या पुरवठा साखळीच्या विविध क्षेत्रांमध्ये असतील. यात इन्व्हेंटरी मॅनेजर, वेअरहाऊस असोसिएट्स, लॉजिस्टिक कोऑर्डिनेटर, किराणा भागीदार आणि डिलिव्हरी ड्रायव्हर्स यांचा समावेश आहे. तथापि, सणासुदीच्या काळात ई-कॉमर्स कंपन्यांनी निर्माण केलेल्या नोकऱ्या अनेकदा हंगामी असतात. 'फ्लिपकार्ट'ने म्हटले आहे की ते सणासुदीच्या आधी नवीन कर्मचाऱ्यांसाठी विस्तृत कौशल्यविकास आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करेल. याच सुमारास 'ॲमेझॉन' आपल्या प्लॅटफॉर्मद्वारे भारतीय निर्यात कंपन्यांना अमेरिका आणि ब्रिटनमध्ये पाच अब्ज डॉलर किमतीच्या लहान वस्तू विकण्यास मदत करेल.

'ॲमेझॉन'च्या 'ग्लोबल सेलिंग प्रोग्राम'अंतर्गत भारतातील सुमारे दीड लाख छोटे निर्यातदार 'ॲमेझॉन'च्या 'ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म'द्वारे आपली उत्पादने थेट परदेशी ग्राहकांना विकू शकतील. 'ॲमेझॉन'ने २०१५ मध्ये ग्लोबल सेलिंग प्रोग्राम सुरू केला. 'ॲमेझॉन'च्या या निर्णयाचा सर्वात मोठा फटका चीनला बसणार आहे. कारण याआधी छोट्या-छोट्या बहुतांश वस्तू चीनमधून आणल्या जात होत्या; पण जागतिक पुरवठा साखळीत भारताच्या वाढत्या वर्चस्वाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आता चीनमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहेत. 'ॲमेझॉन'चे 'ग्लोबल ट्रेड'चे संचालक भूपेन वाकणकर म्हणाले की आम्ही अशा साधनांमध्ये आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहोत, ज्यामुळे विक्रेत्यांना उत्पादनासह विक्री वाढवून आपल्या व्यवहारांचा आवाका वाढवता येईल. 'ॲमेझॉन' २०२४ च्या अखेरीस ई-कॉमर्स निर्यात १३ अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यासाठी हजारो भारतीय व्यवसायांना मदत करण्याच्या मार्गावर आहे. वाकणकर म्हणाले की 'ॲमेझॉन'ने कापड, दागिने, घरगुती वस्तू आणि आयुर्वेद उत्पादने ऑफर करणाऱ्या देशभरातील छोट्या उत्पादन कंपन्यांना जोडण्यासाठी भारताच्या वाणिज्य मंत्रालय आणि व्यापार संघटनेसोबत भागीदारी केली आहे. ग्राहकांना असा माल थेट परदेशात पाठवणे सोपे आहे आणि आयात कराचा परिणाम होत नाही. 'वॉलमार्ट'ने २०२० मध्ये म्हटले होते की आपण २०२७ पर्यंत भारतातून १० अब्ज डॉलर्सपर्यंत पुरवठा वाढवू. त्यावेळी एकूण पुरवठा तीन अब्ज डॉलर होता.

दरम्यान, आर्थिक आघाडीवर महिलांच्या कामगिरीबाबत एक लक्षवेधी बातमी समोर आली आहे. स्टार्टअप्स आणि फिनटेकमध्ये महिला संचालकांची संख्या गेल्या दहा वर्षांमध्ये तिपटीने वाढली. अलिकडे अनेक स्टार्टअप्स सुरू होत आहेत. मोठी गोष्ट म्हणजे कंपन्या आणि स्टार्टअपमध्ये महिलांची उपस्थिती वाढत आहे. तामिळनाडूमध्ये ही संख्या चौपटीने वाढली आहे. अनेक शासकीय योजनांच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात महिलांचा सहभागही वाढवला जात आहे. महिला सक्षमीकरणासंदर्भात अनेक योजना राबवल्या जात आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की कॉर्पोरेट जगतात महिलांचा सहभाग वाढत आहे. आर्थिक तंत्रज्ञान क्षेत्रात तसेच स्टार्टअप्समध्ये महिलांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारतातील १११ युनिकॉर्नपैकी १८ टक्के कंपन्यांमध्ये महिलांचे नेतृत्व आहे. 'फिक्की'च्या चेन्नई युनिटच्या एका कार्यक्रमात, अर्थमंत्र्यांनी सांगितले की २०१४ मध्ये महिला संचालकांची संख्या २.५८ लाख होती, ती ऑगस्ट २०२४ मध्ये ३.४ पटींनी वाढून ८.८३ लाख महिलांवर पोहोचली आहे. तमिळनाडूमध्ये २०१४ मध्ये कंपन्यांच्या संचालक मंडळावर महिलांची संख्या १५,५५० होती. ती २०२४ मध्ये ४.३ पटीने वाढली. आता तमिळनाडूमधील कंपन्यांच्या संचालक मंडळावर विराजमान असलेल्या महिलांची संख्या ६८ हजार झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला कल्याण आणि सक्षमीकरणाशी संबंधित योजनांसाठी ९७,१३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात ती ३.१० लाख कोटी रुपये झाली.

आजकाल

# हे रामराज्य आहे? हे हिंदुत्व आहे??

**तुषार गायकवाड**

अयोध्येत एका हिंदू दलित कुटुंबातील अवघ्या २० वर्षांची मुलगी बीए च्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेतेय. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने व दलित असल्याने राम जन्मभूमी मंदिर परीसर स्वच्छ ठेवण्यासाठी सफाई कर्मचारी म्हणून काम करते. तिला एका हिंदू तरुणाने फूस लावून प्रेमात पाडले. मुलगी प्रेमात पडल्याची खात्री होताच तिला भेटायला बोलावले.

भेटीवेळी एका गेस्ट हाऊस मधील खोलीत, प्रियकर मुलगा त्याच्या मित्रांना घेऊन आला आणि त्याने पिडीतेचा नकार असतानाही जोर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. पिडीतेने त्याला धुडकावून पळून जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पिडीता भिंतीला धडक बसून कोसळली. तिच्या डोक्याला दुखापत होवून पिडीता बेशुध्द झाली. पिडीतेवर बेशुध्दावस्थेत सामूहिक बलात्कार करण्यात आला. त्या बलात्काराचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले.

पिडीतेस शुध्द आली तेव्हा तिथे वंश चौधरी आणि विनय हे दोघे जण होते. त्यांनी पिडीतेला गेस्ट हाऊसवरुन गॅरेजवर नेले. तिथेही तिच्यावर अमानुषपणे बलात्कार केला. त्याचेही व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. त्या व्हिडिओच्या आधारे पिडीतेचे ब्लॅकमेलिंग सुरु झाले.

या व्हिडिओच्या आधारे दिनांक १६ ऑगस्ट २०२४ ते २५ ऑगस्ट २०२४ च्या कालावधीत पिडीतेला विविध ठिकाणी बोलावून ९ जणांनी विविध प्रकारचे सामूहिक अत्याचार व व्हिडिओ चित्रीकरण केले. २२ ते २४ ऑगस्ट २०२४ या दोन दिवशी तर पिडीतेला खोलीच्या बाहेर सोडलेच नाही. आळीपाळीने तिच्यावर अत्याचार केले. २८ ऑगस्ट २०२४ रोजी पिडीतेने पोलीस ठाण्यात गेल्यास तिच्या बहिणीवर बलात्कार करुन व्हिडिओ सोशल मेडीयावर प्रसिध्द करण्याची धमकी दिली गेली. मनोधैर्य खच्ची झालेली ही पिडीता न्याय मिळावा म्हणून २ सप्टेंबरला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी गेली. मात्र उत्तर प्रदेश पोलीसांनी आरोपींना त्वरित अटक करावयाचे सोडून पिडीतेला, 'माध्यमांपासून दूर राहा. घटनेची वाच्यता करु नकोस. तुझ्या कुटुंबियांनाही बजावून सांग.'अशी धमकी दिली. ९ जणांनी सामूहिक बलात्कार केलेल्या पिडीतेला राजकीय दबावामुळे उत्तर प्रदेश पोलिसांनी दाद मागायला गेल्यानंतर ३६ तास बसवून ठेवले. पिडीतेस 'एफआयआर' ची कॉपी दिली नाही. सोईस्कर एफआयआर दाखल झाली. (बदलापूर बलात्कार प्रकरणातही पोलीसांनी हेच केले होते.)

तब्बल १२ दिवस होवून गेले तरी ९ पैकी ४ आरोपी फरार आहेत. यामागे राजकीय हस्तक्षेप आहे. ज्या ५ आरोपींना अटक केली आहे त्यांची नावे विनय, वंश चौधरी, शारिक, शिवा आणि उदित अशी पोलीसांनी जाहीर केली आहेत. बलात्कारी देखील हिंदू आहेत. आणि त्यांना वाचवण्यासाठी भाजपा सरकारने मदत करणे क्रमप्राप्त आहे. न्यायालयाने बलात्काराची शिक्षा दिलेल्या गुन्हेगारांना मोकाट सोडणे, त्यांचे सत्कार करणे. बलात्कारी नराधमांना वाचवण्यासाठी हातात देशाचा पवित्र तिरंगा घेऊन पोलीस स्टेशनवर मोर्चा काढणे. बलात्काराचे आरोपी जामीनावर सुटून येताच त्यांचे जाहीर सत्कार करणे, उन्मादी मिरवणूका काढणे भाजपमध्ये कॉमन झालेय. बलात्काराच्या आरोपी नराधमांना वाचवण्यासाठी पोलीस प्रशासन व न्यायव्यवस्था राजसत्तेच्या जोरावर पायदळी तुडवणे. बलात्काराचे पिडीतेला बदफैली, छिनाल, धंदेवाली ठरवणे. त्यासाठी सोशल मेडीया कार्यकर्ते व आयटी सेल वापरणे यात भाजपचा हातखंडा आहे. आताही सामूहिक बलात्कार प्रकरणातील पिडीतेला न्याय देण्याऐवजी प्रशासन आरोपींचा बचाव करत असल्याचे स्थानिक खासगीत सांगत आहेत. अयोध्या उत्तर प्रदेश राज्यात असून तिथे भारतीय जनता पक्षाची पूर्ण बहुमताची सत्ता आहे. अजय सिंह बिष्ट उर्फ योगी आदित्यनाथ हे तिकडचे मुख्यमंत्री आहेत. भाजपच्या अनेक समर्थकांना त्यांच्यामधे भावी पंतप्रधान दिसतात. त्यांच्या तोंडी रामराज्यासारखा राज्य कारभार सुरु असल्याची भाषा असते. तरीदेखील या बलात्कार प्रकरणातील ४ आरोपींना गेले १२ दिवस अटक करण्यात आलेली नाही. उत्तर प्रदेश म्हणजे पश्चिम बंगाल नव्हे! शिवाय पिडीता हिंदू दलित असून बलात्कारी नराधम हिंदू असल्याने पिडीतेला न्याय मिळावा म्हणून देशभरात मोर्चे निघणार नाहीत. हिंदू मुलीस मुस्लीम मुलाने फूस लावून प्रेमात पाडणे व लग्न अथवा संभोग करणे म्हणजे 'लव्ह जिहाद' असल्याचे हिंदुत्ववादी सांगतात. मग हिंदू मुलीला हिंदू मुलाने फूस लावून प्रेमात पाडणे. तिच्यावर मित्रांसह सामूहिक बलात्कार करुन त्याचे व्हिडिओ चित्रीकरण करणे यास 'हिंदू बलात्कार जिहाद' म्हणावे का? बलात्काऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सत्ताधाऱ्यांना 'दलालांचे सरकार' का म्हणू नये?

बलात्काऱ्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी, आंध्र प्रदेश राज्याच्या विधानसभेने पूर्ण बहुमताने मंजूर केलेले 'दिशा विधेयक', महाराष्ट्राच्या विधानसभेने पूर्ण बहुमताने मंजूर केलेले 'शक्ती विधेयक' आणि पश्चिम बंगालच्या विधानसभेने पूर्ण बहुमताने मंजूर केलेले 'अपराजिता विधेयक' केंद्रीय गृहमंत्रालयाने आजअखेर कायद्यात रुपांतरीत होवू दिलेले नाही!! अजून किती बलात्काऱ्यांना पाठीशी घातले जाणार आहे? हे रामराज्य आहे? हे हिंदुत्व आहे??

**(साभार)**

लोकसंसद

## एक धक्कादायक वास्तव

सायन्स डायरेक्ट या संख्येने १८८ देशात अभ्यास करून व १९९० ते २०१३ या काळातील एक विशलेषण नुकतेच केले आहे. त्यानुसार जगात विविध आजारांनी अनेकांना ग्रासले आहे. आजचे जीवन अत्यंत धावपळीचे झाले आहे. अनेकांना पर्यावरणाचा त्रास होतो आहे. अशातच महागाई, अन्नधान्याचा तुटवडा या गोष्टीनी सुद्धा भेडसावते आहे. अलिकडे अनेक डॉक्टरांच्या कडे तसेच विविध रुग्णालयात गर्दी पाहावयास मिळत आहे. मेडिकल दुकानांची संख्या वाढतच चालली आहे. सायन्स डायरेक्टच्या अहवालानुसार जगाची लोकसंख्या ८.२ अब्ज आहे. त्यापैकी सुमारे ४.३ टक्के एवढे लोकच निरोगी आहेत. याचाच अर्थ जवळपास ९५ टक्क्याहून अधिकांना काही ना काही व्याधी आहेत ही बातमी नुकतीच वाचली. ही परिस्थिती भयावह व चिंताजनक आहे. कित्येक शहरे गर्दीच्या विळख्यात आहेत. तर वाहनांची प्रचंड संख्या लोकांना त्रासदायक ठरत आहे. ही आकडेवारी २०१३ पर्यंतची आहे. अलिकडच्या काळाचा विचार केला तर ही आकडेवारी आणखीन वाढू शकते. अलिकडे जगात जवळ जवळ सर्वच ठिकाणी कोविद -१९ चा मोठा त्रास झाला. त्यानंतर अनेक लोक आजारी पडले. मणक्याचे दुखणे, कर्णबधिरपणा, नैराश्य, घसा विकार यांनी अनेक लोक त्रस्त आहेत. हाडाचे विकार व स्नायूंचे विकार यामुळेच जास्त लोक आजारी पडत आहेत. एकूणच ही आकडेवारी धक्कादायक आहे यावर विचार करणे आवश्यक आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१६ सप्टेंबर**

**१८२५ :-** कवी, संस्कृत काव्य नाटकांचे भाषांतरकार गणेश सदाशिवशास्त्री लेले यांचा जन्म. ह्यांनी चार संस्कृत नाटकांची मराठी भाषांतरे, काही इंग्रजी पुस्तकांची मराठी भाषांतरे, तसेच त्यांच्या काव्यरचनेत श्रीमच्छंकराचार्यविरचितं अमरशतक', 'महाकवी कालिदास विरचित रघुवंश' ही भाषांतरीत तर 'शिवचरित्र', 'कृष्णकमल' ही स्वतंत्र अशी ऐतिहासिक काव्यरचना. याशिवाय 'तीर्थयात्रा प्रबंध' हे प्रवासवृत्त त्यांनी सरदार अण्णासाहेब विंचूरकर यांच्या प्रवासांच्या टाचणांवरुन तयार केले. यात दुसऱ्या बाजीरावाच्या दिनचर्येचे वर्णन असल्याने ऐतिहासिकदृष्ट्या हा त्यांचा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. **१८८१ :-** इतिहास संशोधक, चरित्रकार आणि स्थलवर्णनपर पुस्तकांचे लेखक यशवंत राजाराम गुप्ते यांचा जन्म. कऱ्हाड (स्थलवर्णन प्राचीन अवशेष इत्यादी), आमची परळीची (सज्जनगड) यात्रा', 'घारापुरीची लेणी', 'सखाराम हरी गुप्ते' यांचे चरित्र आणि अनेक निबंधवजा पुस्तिका त्यांनी लिहिल्या आहेत. **१९०३ :-** ज्ञानेश्वरीचे अभ्यासक, संत नानामहाराज साखरे यांचे निधन. ह्यांनी ज्ञानेश्वर एक नसून दोन आहेत या वादाचे खंडन करणारी लेखमाला लिहिली. ती लो. टिळकांनी केसरीतून प्रसिध्द केली. तसेच त्यांच्या मुलाने त्यांनी लावलेल्या ज्ञानेश्वरीचा अर्थ लिहून 'सार्थ ज्ञानेश्वरी' या नावाने प्रसिध्द केली. **१९१३ :-** 'रुचिरा' ह्या पाकशास्त्रावरील गाजलेल्या आणि प्रचंड खप असलेल्या पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई ओगले यांचा जन्म. **१९१५:-** विनोदी नट, नाटककार आणि कलाविकास या नाट्यसंस्थेचे नागेश कृ. जोशी यांचा जन्म. मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात नाटककार म्हणून त्यांनी नावलौकिक संपादन केला. 'देवमाणूस' हे त्यांचे नाटक इतके गाजले की त्याच्या पुस्तक रुपात नऊ आवृत्या निघाल्या. याशिवाय 'फुलपाखरे', 'मैलाचा दगड', 'विजय आणि अंतरपाट' ही नाटके त्यांनी लिहिली. **१९२०:-** लेखक खुनाथ सखाराम बोरकर यांचा जन्म. 'वडार गाणी' हा लोकगीत संग्रह प्रकाशित झाला आहे. **१९२४ :-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी प्राचार्य डॉ. अनंतराव जयवंतराव जगताप यांचा जन्म. 'इथे मराठीचिये नगरी' ह्या ग्रंथातून मराठी साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव दर्शवलाय. तसेच 'मुक्तीसंग्राम' हे पददलितांच्या जीवनावर तर 'युगान्त' हे इंदिरा गांधीच्या मृत्यू घटनेवरील काव्य याशिवाय गौरवांजली आणि शिवारातील गीते हा ग्रामीण काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९२८:-** पत्रकार अ. स. मराठे यांचा जन्म. दै. मराठातून पत्रकारितेला प्रारंभ. पुढे दै. महाराष्ट्र टाइम्सचे ते मुख्य उपसंपादक पदापर्यंत पोहचले होते. **१९२९:-** लेखक, योगशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. कालिदास सदाशिव जोशी यांचा जन्म. ह्यांनी प्राणायमची शास्त्रीय माहिती देणारा 'प्राणायाम' हा ग्रंथ लिहिला. **१९३६:-** लेखक, पत्रकार, संपादक सदाशिव केशव कुलकर्णी यांचा जन्म. 'अंतराळात झेप', 'चंद्रावर माणूस' तसेच 'देवस्थान' हे धार्मिक विधीसंबंधी, तसेच 'समर्थ रामदासांची उपासना', 'हनुमान स्वामींची बखर' अशी ग्रंथ संपदा. **१९४२:-** निसर्गकवी ना. धों. महानोर यांचा जन्म. 'प्रार्थना दयाघना' ही दुष्काळावरील दीर्घकविता, 'गांधारी' ही कादंबरी आणि 'गावातल्या गोष्टी', 'गपसप' (कथा संग्रह)', 'अजिंठा' दीर्घकाव्य आणि 'रानातल्या कविता', 'वही', 'पक्ष्यांचे लक्ष थवे', 'पावसाळी कविता', 'पळसखेडची गाणी' हे काव्यसंग्रह सुपरिचित आहे. खान्देशी 'वही'चा बाज आणि 'नाचणभिवरी', 'झिम्माड', 'अंग जरतार', 'ऐन हुरड्यात' यासारख्या रसरशीत शब्दांचा साज, ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये. महानोरांनी 'यशवंतराव चव्हाण', 'शेती : आत्मनाश व संजीवन', 'शरद पवार आणि मी' असे लेखनही केले आहे. याशिवाय 'पुन्हा काबिला', 'पुन्हा एकदा कविता' हे संपादन तसेच जैत रे जैत', 'एक होता विदूषक' या गाजलेल्या चित्रपटांची गीते त्यांनी लिहिलीत.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते
रमेशचंद्र गजानन वार्डे, अलिबाग

# नेरळमध्ये चोरी करणारे त्रिकुट गजाआड

## सव्वा सहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत; पोलिसांची उल्लेखनिय कामगिरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत गणेश उत्सव निमित्त गावाला गेलेल्या शिक्षक दाम्पत्याच्या घरी चोरी झाली होती.त्यावेळी तब्बल सव्वा सहा लाखाचे दागिने आणि रोकड लंपास करण्यात आली होती. नेरळ पोलिसांनी चार दिवसात आरोपींना ताब्यात घेतले तसेच चोरी झालेला सर्व मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही चोरी करणाऱ्या एका तरुणाला अटक केली असून अन्य दोन तरुण हे विधी संघर्षित बालके आहेत.**



नेरळ गावातील सम्राटनगर भागातील साईधाम सहकारी गृहनिर्माण संस्थेत राहणारे मोईनुद्दिन तय्यबअली मोमीन आणि त्यांचे कुटुंब गणेश उत्सवाची सुट्टी असल्याने आपल्या गावी बार्शी सोलापूर येथे गेले होते. मोमीन दाम्पत्य कळंब येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेवर शिक्षक असून त्यांचे घर बंद करुन कुटुंबियांसह बार्शी, सोलापूर येथे गेले होते.साईधाम इमारतीमधील त्यांच्या शेजारी राहणाऱ्यांनी मोमीन यांना फोन करुन त्यांच्या रुमच्या दरवाजाची कडी तोडलेली आहे तसेच बेडरुममधील कपाट उघडे असून सामन अस्ताव्यस्त पडलेले आहे अशी माहिती दिली. प्रथमदर्शनी घरात चोरी झाल्याचे फिर्यादी माईनुद्दिन मोमीन यांना कळविले. त्याप्रमाणे मोमीन हे ११ सप्टेंबर रोजी आपल्या घरी आले आणि त्यानंतर घराची पाहणी करून चोरी झाली असल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाणे येथे दिली.

फिर्यादी यांचे सोन्याचे सुमारे ८ तोळे व चांदीचे १८० ग्रॅम वजनाचे दागिने व रोख रक्कम ८५,००० चोरीला गेली आहे. चोरीस गेलेले दागिने, लहानसहान वस्तू, नेमकी रोख रक्कम किती याची खात्री करुन पोलीस ठाण्यात चोरीबाबत तक्रार दिली. सदर गुन्ह्याचे तपासकामी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी धूळदेव टेळे यांच्या मार्गदर्शन घेवून नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाकडे तपास दिली.

पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग किसवे आणि त्यांच्या पथकातील अंमलदारांना समक्ष सुचना आणि मार्गदर्शन केले.गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार बेंद्रे आणि वांगणेकर यांनी घटनास्थळावरील येण्याजाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पाहिले असता रात्रीच्या वेळी हातात लोखंडी कटावणी घेवून तरुण जात असल्याचे दिसून आले.

त्यानंतर पुढील धागेदोरे चोरट्यांचे नाव निष्पन्न करून धामोते आदिवासी वाडीमधील संजय नारायण दळवी आणि अन्य दोन विधि संघर्षित बालके यांना ताब्यात घेतले.दोन विधीसंघर्षित बालक आणि संजय नारायण दळवी या तिघांनी गुन्ह्याची कबुली दिली आणि लपवून ठेवलेला मुद्देमाल त्यांच्याकडून हस्तगत केला. त्यांच्याकडून ८ तोळ्याचे सोन्याचे दागिने, १८० ग्रॅम वजानी चांदीचे दागिने व रोख रक्कम ८५,००० असा एकुण ६,२२,५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी संजय नारायण दळवी यास कर्जत न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## हिराबाई जाधव यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील रहिवासी असणाऱ्या हिराबाई शिवराम जाधव यांचे रवि. दि. ८ सप्टेंबर रोजी वयाच्या सुमारे ७० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



हिराबाई जाधव या शांत व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्यांनी आपल्या मुलांवर चांगल्या सुसंस्कार करून एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती,दोन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी मंगळ दि. १७ सप्टेंबर रोजी तर अंतिम धार्मिकविधी शुक्र. दि. २० सप्टेंबर रोजी राहत्या घरी निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# कचराकुंडी तोडल्याने मनसेचा उपोषणाचा इशारा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत मधील खांडा गावातील रस्त्याच्या कडेला असलेली कचराकुंडी तेथील ग्रामपंचायतचे माजी सदस्याने कंत्राटी कामगार घेवून तोडून टाकली आहे. दरम्यान, तेथे असलेल्या पाणीपुरीवाल्यासाठी ग्रामपंचायतीने आर्थिक निधी खर्च करून बांधलेली कचराकुंडी तोडली असून पुन्हा त्याच ठिकाणी कचराकुंडी उभारली नाही तर ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर उपोषण करण्याचा इशारा मनसेचे नेरळ शहर उपाध्यक्ष आणि स्थानिक ग्रामस्थ सुभाष नाईक यांनी दिला आहे.

दोन वर्षापूर्वी नेरळ ग्रामपंचायतीने मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधी खर्च करीत नेरळ गावात विविध भागात कचरा कुंड्या सिमेंट वीट बांधकाम करून बांधल्या होत्या.त्यातील खांडा गावातील कचरा कुंडी येथील माजी सदस्य हे आपल्या कंत्राटी कामगार यांना सोबत घेऊन तोडत होते. गणेश उत्सव सुरू असताना कचराकुंडी तोडली जात असल्याने स्थानिक ग्रामस्थ



सुभाष नाईक यांनी कचराकुंडी कशासाठी तोडली जात आहे, अशी विचारणा केली असता नव्याने बांधण्यासाठी तोडली जात असल्याचे सांगितले. मात्र त्या ठिकाणी असलेल्या पाणीपुरीवाल्याला या कचराकुंडीचा त्रास होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांची गैरसोय करीत कचराकुंडी तोडण्यात आली. कचराकुंडी तोडण्यासाठी कामगार आणणारे माजी सदस्य हे आता ग्रामपंचायत सदस्यदेखील नाहीत. संबंधित कचराकुंडी तोडण्यासाठी नेरळ ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी दिलेली नाही.

तरीदेखील एका पाणीपुरीवाल्याला खुश करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांची गैरसोय करून कचरा कुंडी तोडली आहे.

> **स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी कोणालाही ती कचराकुंडी तेथून हलवून देणार नाही. ग्रामपंचायतीला त्या तोडण्यात आलेल्या कचराकुंडी बद्दल कोणतीही माहिती नसल्याने ग्रामपंचायत मालकीची कचरा कुंडी तोडणाऱ्या व्यक्तीवर नेरळ ग्रामपंचायतीने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करावा.**
> **– सुभाष नाईक, ग्रामस्थ**

त्यास स्थानिक ग्रामस्थ सुभाष नाईक यांनी विरोध केला असून पुढील आठ दिवसात त्याच ठिकाणी नव्याने कचराकुंडी बांधण्यात यावी आणि नवीन कचराकुंडी बांधण्यासाठी आलेला खर्च हा चांगल्या स्थितीत असलेली कचराकुंडी तोडण्यासाठी कामगार लावणाऱ्या माजी सदस्यांकडून वसूल करावा अशी मागणी केली आहे. नेरळ ग्रामपंचायतीकडे दिलेल्या निवेदनात ही मागणी केली असून उपोषणाचा इशारा दिला आहे.

# आदिवासी वस्तीत शिरला अजगर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
भक्ष्याच्या शोधात विंधणे आदिवासी वस्तीत शिरलेल्या ११ फुटी लांबीच्या अजगराला वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे सदस्य राजेश पाटील यांनी शिताफीने पकडले. त्यानंतर त्याला नैसर्गिक आवासात सोडून देण्यात आले.

विंधणे-उरण येथील आदिवासी वस्तीत बुधवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास एक इंडियन पायथॉन जातीचा अजगर कोंबड्यांचा पाठलाग करताना दिसला. ११ फुटी लांबीच्या अजगराला पाहून आदिवासींनी सर्पमित्र राजेश पाटील यांच्याशी संपर्क साधला.

त्यांनीही क्षणाचा विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. सर्पमित्र राजेश पाटील यांनी



कोंबड्यांच्या मागावर आलेल्या अजगराला शिताफीने पकडले.याची खबर लगेचच वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। कोलाड । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील चणेरा विभागातील नावलौकीक असलेल्या खैराळे येथे जय हनुमान मित्र मंडळ खैराळे व मुंबईकर मित्र मंडळाच्या वतीने खैराळे धावीर मंदीर सभागृहात गणपती उत्सवाचे औचित्य साधून येथील गुणवंत विद्यार्थी, खेळाडू,तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी,युवक,युवती,शिक्षक, सामजिक, कार्यकर्ते यांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरचा गुणवंत विद्यार्थी सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत परेश सकपाळ, शशिकांत गंभे, रामचंद्र म. सकपाळ, शरद वा. गंभे, नरेंद्र म. सकपाळ, गोपीनाथ



गंभे, किशोर गंभे, दीपक गंभे, योगेश गंभे, रामचंद्र गो.गंभे, मधुकर ह. सावंत, शैलेश पा. सकपाळ, मेघा सावंत, मितेश गंभे, अनिल गंभे, सुरेश गंभे आदी मान्यवर विद्यार्थी सत्कारमूर्ती तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच त्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप त्याच बरोबर सामजिक कार्यात उल्लेखनीय कामगिरी करणारे नागरिकांचा सन्मान यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक गंभे यांनी केले तर प्रास्तविक माजी अध्यक्ष सुधीर सावंत यांनी मंडळाचे सचिव यांनी मान्यवाराचे स्वागत गीत गाऊन स्वागत केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## इसम बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
कळंबोली येथे बसमधून उतरलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बाळू देवसिंग शेळके (४०) असे या इसमाचे नाव असून उंची ५ फुट ६ इंच, रंग गोरा, केस काळे, नाक सरळ, डोळे काळे असून, कपाळावर उजव्या बाजूस टेंगुळ आहे. नाकाला मार लागल्याची खुण आहे. त्याच्या अंगात निळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, तसेच पायात काळ्या रंगाची साधी बुट आहेत. सोबत मोबाईल फोन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा पो.हवा.एच.एस.शेलार यांच्याशी संपर्क साधावा.

# तरुणांनी जोपासला सारीपाटाचा खेळ

**। कोलाड । वार्ताहर ।**
महाभारतातील खेळला गेलेला सारीपाटाचा (द्युत) खेळ रोहा तालुक्यातील गोवे तसेच संभे गावात पिढ्यानं पिढ्यापासून सुरु असुन या गावातील तरुणांनी अजून ही टिकून ठेवला असल्याचे दिसून येत आहे.

हा सारीपाटाचा खेळ गणेश उत्सवापासून दसऱ्यापर्यंत रोहा तालुक्यातील गोवे तसेच संभे गावात खेळला जात आहे. या खेळाचे दर्शन लोकांना जय मल्हार मालिकेतून अवघ्या महाराष्ट्राला झाले असले तरी आधुनिक काळात असे खेळ काळबाह्य होत असतांना आजही या दोन्ही गावातील तरुणांनी सारिपाटची परंपरा सुरु ठेवली आहे.

या खेळासाठी कापडी सारीपाट वापरला जात असुन सोंगट्या म्हणून



लाकडी सोंगट्यांचा वापर केला जात आहे. लाकडी सोंगट्या कापडी पटावर घेऊन हा खेळ सुरु होतो.फासे म्हणून कवड्यांचा वापर केला जातो. ज्याप्रमाणे खेळाडू कवड्यांचे दान घेतो. त्या दानानुसार सोंगटी पटावर चालवली जाते व हा खेळ दोन गटात खेळला जात असल्यामुळे ज्या गटाच्या सोंगट्या मध्यभागी जातील तो गट विजयी होतो. तर एका गटाने सोंगटी मारल्यानंतर दुसऱ्या विरोधी गटानी सोंगटी मारली तर खेळ बरोबरीत सुटतो.

या खेळाचा डाव पूर्ण होण्यासाठी चार तास लागतात त्यामुळे पूर्ण जागरणासाठी दोन ते तीन डाव होतात विशेष म्हणजे या खेळात पैशाचा वापर केला जात नाही. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात एक जागरण म्हणून गणपती उत्सवात हा खेळला जात आहे.

पूर्वी सारीपाटाच्या खेळात जागरण म्हणून तरुण वर्गाचा सहभाग असायचा सध्या मात्र बाल्या नाच, महिलांचे खेळ याप्रमाणे सारिपाट खेळाकडे तरुणांनी पाठ फिरवली असून फक्त जागरण म्हणून जुगार खेळून जागरण होईल असेच तरुण वर्गाला वाटत असुन यामुळे लाखो तरुण कर्जबाजारी होऊन आत्महत्येला प्रवृत होतात असले खेळ खेळण्यापेक्षा गोवे तसेच संभे गावातील तरुणांप्रमाणे या परंपारीक खेळा कडे वळावे यामुळे जागरण पण होईल व पैसा ही वाया जाणार नाही अशी प्रतिक्रिया संभे येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ.मंगेश सानप यांनी व्यक्त केली आहे.

# पाली बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता चकाचक

**। सुधागड । वार्ताहर ।**
पाली अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची खड्ड्यांमुळे बिकट अवस्था झाली होती. गणपती सण असल्याने हा मुख्य रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी होत होती. काही तांत्रिक कारणामुळे या रस्त्याचे काम होत नव्हते. मात्र, रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे मालक राजू पिचके यांनी स्वखर्चाने नुकतेच या रस्त्याचे पूर्णपणे डांबरीकरण केले. परिणामी, बल्लाळेश्वर मंदिराकडे व इतर गावाला जाणारे भाविक तसेच नागरिकांचा मार्ग सुकर झाला.

हा रस्ता तातडीने सुस्थितीत व्हावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत होती. गणपती सण आल्यामुळे मुंबई, पुणे आदी शहरांतील व जिल्ह्यातील चाकरमानी गणपती सणासाठी आपापल्या गावात याच रस्त्याने जातात व येतात. तसेच बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची रेलचेल असते. येथील सबरजिस्टर कार्यालय ते बल्लाळेश्वर



मंदिरापर्यंतच्या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली होती.

मात्र, आता या रस्त्याची पूर्णपणे डांबरीकरण झाल्यामुळे पालीकर जनता तसेच सुधागडवासी आणि बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे. नगराध्यक्षा प्रणाली शेळके व नगरपंचायत मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरुणकर यांच्या हस्ते नारळ वाढवून डांबरीकरणास सुरुवात करण्यात आली.

## संगणक प्रशिक्षणाची संधी

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**
महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतीना इतर कोणताही विभाग, संस्था अथवा महामंडळा मार्फत लाभ मिळत नाही. त्यांना संगणक कौशल्यात विकसित व प्रशिक्षित बनण्यासाठी आवश्यक कौशल्य, ज्ञान आणि पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे आणि उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन स्वावलंबनाला चालना देण्याच्या उद्देशान अमृत आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराअंतर्गत एमकेसीएलमार्फत राबविण्यात येणाऱ्या काही निवडक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवड झाल्यावर प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येणार आहे.

## गणेशोत्सवात महावितरणकडून सुरळीत वीजपुरवठा

**। तळा । वार्ताहर ।**
तळा शहर आणि ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सातत्याने सुरू होता. विजेच्या वारंवार खंडित होण्याने नागरिक हैराण झाले होते. विजेच्या अनियमिततेमुळे त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत होता. पाण्याची टंचाई भासू लागली याबाबतीत एकता आघाडी आणि शेतकरी संघटनेने देखील लेखी पत्र, संवाद बैठकीचे आयोजन केले होते. त्याची दखल येथील उपअभियंता घावरे यांनी घेतली आणि मुसळधार पावसाने येथील परिसरातील खंडित झालेला वीजपुरवठा महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सुरळीत केला.

गेले आठ दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे तळा तालुक्यातील अनेक ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे जनतेची गैरसोय झाली. मात्र, भरपावसात अथक परिश्रमाने येथील महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत करून लोकांना दिलासा दिला. मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे परिसरातील तळा शहर, वृंदावन, तळेगाव ऊसर, बेलघर, गिरणे, सोनसडे, मांदाड आदी गावांमध्ये अनेक ठिकाणी वीजपुरवठा करणाऱ्या खांबांवरील तारांवर झाडे पडल्याने तारा तुटल्या होत्या. परिणामी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र, येथील वीज कर्मचाऱ्यांनी मुसळधार पावसातही विविध प्रकारे प्रयत्न करून वीजपुरवठ्यात आलेले अडथळे दूर करून परिसरातील वीजपुरवठा सुरळीत केला.

### सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम

# कर्जतमधील नवरत्नांचा सन्मान

**। कर्जत । वार्ताहर ।**
**कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्यावतीने कर्जत तालुक्यातील विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या वीस नवरत्नांचा तसेच पाच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा सन्मान करण्यात आला. सागम गेली ८८ वर्षे विविध उपक्रम करीत असून यंदा प्रथमच मंडळाने हा उपक्रम केला आहे. कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने श्री कपालेश्वर मंदिरच्या सभागृहात स्टकर समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मंडळाचे खजिनदार पंकज शहा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विवेक भागवत यांनी मंडळाच्या ८८ वर्षांच्या कार्याचा आढावा सादर केला.**

या प्रसंगी कु. खुशी हजारे (बाल कलाकार), कु. अमृता भगत (राष्ट्रीय पॉवर लिफ्टींग खेळाडू), निलेश परदेशी (आरोग्य सेवक), विजय मांडे (पत्रकारिता), सिद्धांत जोशी (गेमर), राजेश कोठारी (सार्वजनिक रक्तदाता), सागर सुर्वे



(इतिहास अभ्यासक), क्रिशा जैन (महिला वैमानिक ), संतोष दगडे (एव्हरेस्ट वीर), डॉ. अनिरुद्ध जोशी (आरोग्य), जुई गडकरी (प्रसिध्द अभिनेत्री ), पराग बोरसे ( जगप्रसिध्द चित्रकार ), नितीन आरेकर ( शिक्षण, निवेदक, लेखक), प्रसाद पाटील (भजन), महेश वैद्य (उद्योजक), श्रीराम पुरोहित (कीर्तनकार), जान्हवी मुळे (पत्रकारिता), गुरुनाथ साठेलकर (बचत कार्य), राहुल वैद्य (अभिनेता), विवेक भागवत (संगीत) या नवरत्नांचा तसेच दहिवली विचार मंच, नूतन गणेश मंडळ, ओंकार मित्र मंडळ, पाटील आली. गणेशोत्सव मंडळ, वंदे मातरम मित्र मंडळ या संस्थांना श्री शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व गणेश प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. आरेकर यांनी मनोगत व्यक्त करताना मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत परंतु आपल्या माणसांनी केलेला आजचा सन्मान माझ्या ह्रुदयात कायमच राहील. आमदारांनी अनेक विकास कामे केली आहेत. तालुक्यात राम गणेश गडकरी, आरती प्रभू, प्रबोधनकार ठाकरे यांच्या सह अनेक नामवंतांनी वास्तव्य केले आहे. कर्जत शहरात पुस्तकांचे गाव वसवावे. असे सूचित केले.

जुई गडकरी यांनी, श्री कपालेश्वराच्या कृपेनेच मी यश मिळवले आहे. ते कायमच स्मरणात आहे. असेच कृपाछत्र श्री कपालेश्वरा बरोबरच कर्जतकरांचे कायम असावे. अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी निलेश हरिश्चंद्रे, मिलिंद चिखलकर, दिलीप गडकरी, विकास चित्ते, मंगला पुरोहित, मल्हारी माने, सुनील कदम, सदानंद मुळे, दिनेश कडू, वैदेही पुरोहित, दिनेश जैन, दीपा बोरसे, अभिजीत मराठे, सदानंद जोशी, अश्विनी बोरसे, प्रशांत पाटील, अमित मराठे, मंदार लेले, रौनक कोठारी, दीपक बडगुजर, मिलिंद खंडागळे, कौस्तुभ परांजपे, कल्पेश शाह, रघुनाथ खैरे, सर्वेश गोगटे आदी उपस्थित होते.

**निवडक**

### अध्यक्षपदी सुनीत ठक्कर

**पनवेल :** श्री पनवेल गुजराती नवरात्री महोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी सलग १९ वेळा सुनीत ठक्कर यांची निवड झाली आहे. त्यांच्यासह उपप्रमुख बकुल भानुशाली, सेक्रेटरी पंकज रुपारेल, उपसेक्रेटरी भावेश सुचक, खजिनदार भावेश उनडकठ, उपखजिनदार भाविन सोनेता हे आहेत.यांच्या नियुक्तीबद्दल बबन पाटील, उद्योजक राजेश कोटक, यतीष सादराणी, विलास कोठारी, भुपत सुबा, देवेंद्र पोपट, सुनील सुचक, दिलीप सिंघवी, समीर माखेचा, अशोक ठक्कर यांनी अभिनंदन केले आहे.

### दुचाकीस्वारास लुटले

**पनवेल :** दुचाकीची कारला ठोकर लागल्याने कारमधील इसमांनी खाली उतरून दुचाकी चालकाला मारहाण करण्यासह त्याच्याजवळील ९२ हजार रुपये आणि मोबाईल घेऊन चोरटे पळून गेले. मोहम्मद सय्यद हा धानसर ठाकूरपाडा येथे आला असता पेट्रोल पंपासमोर सफेद रंगाच्या कारला दुचाकीची ठोकर लागली. यावेळी कारमधून तीन ते चार इसम खाली उतरले व दमदाटी करून कारचे नुकसान झाले आहे असे बोलून भरपाई दे असे सांगत त्याच्याकडून ९२ हजार रुपये आणि मोबाईल घेत पलायन केले.

### रोजगाराभिमुख मोफत प्रशिक्षण

**पनवेल :** रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे मोफत आयोजन केले आहे. बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह, ऑटोमोटिव्ह कन्सल्टन्ट, फ्रंट ऑफिस असिस्टंट, कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह, क्वीक सर्व्हिस रेस्टॉरंट एक्झिक्युटिव्ह, फूड अँड बेव्हरेज सर्व्हिसेस स्टिव्हर्ड, हाऊस किपींग ऑपरेशन्स, रिटेल सेल्स असोसिएट्स, ऑटो सर्व्हिस टेक्निशियन, असिस्टंट इलेक्ट्रिशियन, फिल्ड टेक्निशियन एसी, जनरल ड्युटी असिस्टंट या कोर्सेसचे प्रशिक्षण आहे.

### चतुरंगचा सुवर्णमहोत्सव

**पनवेल :** प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात आपल्या जीवनगौरव पुरस्कारासाठी होणाऱ्या रंगसंमेलनाव्यतिरिक्त यावर्षी चतुरंग प्रतिष्ठानने आपल्या पन्नाशीच्या पूर्ततेनिमित्ताने मुंबईमध्ये सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस दोन दिवसांच्या सुवर्णमहोत्सवी आनंद सोहळ्याचे आयोजन केले आहे. ११ नामवंत गुणवंतांचा चतुरंग सुवर्णरत्न सन्मानाने जाहीर सन्मान करताना, त्यांच्या गौरवाप्रित्यर्थ नृत्य, नाट्य, साहित्य, संवाद, गायन-वादन अशा कलाविष्कारांचे विशेष आयोजन केले आहे.

### संविधान मंदिराचे उद्घाटन

**तळा :** तळा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तळा येथे भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते आभासी पध्दतीने संविधान मंदिराचे उद्घाटन पार पडले.राज्यभरात ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिर निर्माण करण्यात आले आहेत. या संविधान मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी तळा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संदीप शेरे,मेढा सरपंच मधुकर वारंगे यांसह शिक्षक वृंद,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगडातील एसटी स्थानकांचा कायापालट

**। पेण । प्रतिनिधी ।**

सुमारे वीस ते पंचवीस वर्षानंतर रायगड जिल्ह्यातील पेण, रामवाडी व वडखळ येथील एसटी स्थानकांनी कात टाकल्याने स्थानकांच्या कायापालटाला सुरूवात झाली असून, प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

रायगड जिल्हयातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण, रामवाडी व वडखळ बस स्थानकाची दुरवस्था झाली होती. मागील सुमारे २० ते २५ वर्षापासून येथील प्रवाशांना खड्ड्यातून, चिखलातून, पाण्यातून, धूळीतून व मोठमोठ्या दगड रेतीमधून प्रवास करायला लागायचा. स्थानकातील खड्ड्यामधील दगड एसटीच्या टायरखाली येऊन उडत असल्याने काही प्रवाशांना दुखापतही व्हायची. पावसाळ्यात तर बसस्थानकात गुडघाभर पाणी साचायचे, संपूर्ण बसस्थानक चिखल व पाण्याने भरायचा. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, विद्यार्थीवर्गासह प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे प्रवाशांना एसटीने प्रवास करणे जिकरीचे झाले होते. याबाबत प्रवासी संघटना व जनतेने तक्रारी करून देखील त्याकडे एसटी प्रशासन दुर्लक्ष करीत होते.

पेण व वडखळ बसस्थानकांना चांगल्या प्रकारे प्लॅटफॉर्म बनवून त्यावरून लाल परी धावायला सुध्दा लागली आहे. तर रामवाडी एसटी स्थानकात प्लॅटफॉर्म बनवण्यात येत आहेत. उंच भराव करून काँक्रिटीकरण करण्यात येत असल्याने भविष्यातही या स्थानकांमध्ये पावसाळ्यात पाणी साचून प्रवाशांना त्रास होणार नाही. पेण व वडखळ येथील स्थानकांचे काम जलद गतीने सुरू असून ते लवकरच पूर्ण होईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर एसटी स्थानकात पे अँड पार्कची व्यवस्था करण्यात येणार आहे.

ज्यायोगे प्रवाशांना त्यांची दुचाकी वाहने एसटी स्टँड परिसरात पे अँड पार्कमध्ये लावता येतील. त्यातून एसटी महामंडळाला उत्पन्न सुरू होईल अशी माहिती पेण स्थानकाच्या आगार व्यवस्थापक अपर्णा वर्तक यांनी दिली.



**पेण, वडखळ या बसस्थानकातून लालपरी आता खऱ्या अर्थाने धावायला सुरुवात झाली आहे. याचे सर्व श्रेय रामेश्वर कंन्स्ट्रक्शनचे मालक व त्यांच्या टिमला द्यावे लागेल. ऐन गणपती उत्सवाच्या काळात रामेश्वर कन्स्ट्रक्शनने केलेले काम अतिशय नेटनेटके व जलदगतीने केले आहे. या बाबत रामेश्वर कंन्ट्रक्शनचे मालक राजू पिचिका यांच्याशी आमच्या प्रतिनिधींनी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, एसटी स्थानकांची सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पेण बसस्थानकांसोबतच रामवाडी आणि वडखळ बसस्थानकात सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात येत आहे. तर लवकरच नागोठणे एसटी स्थानकाचे कामही सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# नागोठण्याची ऐतिहासिक परंपरा अबाधित ठेवा

**पोलीस उपअधीक्षक रविंद्र दौंडकर यांचे आवाहन**

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे शहर व विभागात सर्व धर्मीय समाज बांधव, सर्व नागरिक एकोप्याने राहतात. सर्व सण उत्सव एकत्र येऊन गुण्यागोविंदाने साजरे करतात असा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर ईद-ए-मिलाद व अनंत चतुर्दशी दिवशी काढण्यात येणाऱ्या गणपती विसर्जन मिरवणुकीवेळी जातीय सलोखा कायम राखत गैरसमजातून वाद निमर्ण होत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक रविंद्र दौंडकर यांनी नागोठणे पोलीस ठाण्यातील शांतता समितीच्या बैठकीत उपस्थित नागोठणेकर नागरिकांना केले.



ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी दिवशी गणपती विसर्जन तसेच पुढे येणारी विधानसभा निवडणूक या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात पोलीस उपअधीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या उपस्थितीत शांतता समिती, मोहल्ला कमिटी व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली. यावेळी सहा.पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अखलाक पानसरे, नाजीम नाळखंडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, प्रकाश कांबळे, अशपाक पानसरे, सिराज पानसरे, आसिफ अधिकारी, संजय काकडे, राजेश्री टके, निलोफर पानसरे, बिलाल कुरेशी, राजेंद्र गुरव, किर्तीकुमार कळस, सुनील कुथे, संतोष जैन, मुजफ्फर कडवेकर, हनीफ पठाण, नितीन राऊत, रविंद्र कदम, पो.ह. विनोद पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



● मुरुड शहराला पाणीपुरवठा करणारे खारआंबोळी धरणाचे मनमोहक छायाचित्र आकाशातून टिपले आहे, मुरूडचे छायाचित्रकार शंतनू नाझरे यांनी.

# महाड न्यायालयाच्या इमारतीसाठी ३३ कोटी

**। महाड । वार्ताहर ।**

महाड येथे दिवाणी न्यायालयाची नवीन इमारत बांधण्याकरिता ३३ कोटी २८ लाख रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यतादेण्यात आलीआहे.याबाबत न्याय व विधी विभागाकडून १२ सप्टेंबरला निर्णयही पारित करण्यात आला आहे.

महाडमध्ये सद्यस्थितीत असलेली न्यायालयाची इमारत कामकाजाच्या दृष्टीने जुनी व अपुरी असून या ठिकाणी वाहतूक कोंडीही होते. महाड बार असोसिएशनकडून दिवाणी न्यायालयाची नवीन इमारत बांधण्याकरिता सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचे अध्यक्ष ॲड. संजय भिसे यांनी सांगितले. या पाठपुराव्याला अखेर यश आले असून उच्च न्यायालयाने पाठवलेल्या प्रस्तावाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे लवकरच महाडमध्ये बस स्थानकाच्या जवळील जागेमध्ये न्यायालयाची नवी इमारत उभी राहणार आहे.

बस स्थानकाजवळ असणारी सरकारी दूध डेअरीची जागा यापूर्वी न्यायालयासाठी देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून न्यायालयाच्या इमारतीचे काम लवकरच हाती घेतले जाणार आहे.

या नव्या इमारतीमुळे नागरिक, पक्षकार तसेच वकिलांची गैरसोय दूर होणार आहे.पाच मजली वास्तू न्यायालयाच्या नवीन इमारतीकरिता ३३ कोटी २८ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

# पनवेल मनपातील विकासकामांवर टीका

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे पनवेल मनपा हद्दीतील विकास कामांवर जोरदार टीका करण्यात आली असून या संदर्भात जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या प्रलंबित विकास कामांवर आवाज उठवून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले आहे.



या संदर्भात बोलताना जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी सांगितले की, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात लागून असलेल्या छत्रपती संभाजी महाराज मैदानासाठी १० कोटीचे टेंडर काढले असून गेली तीन वर्षे काम पूर्ण करण्याचा थांगपत्ता नाही. खारघर शहरातील लिटल वर्ल्ड ते हिरानंदानीपर्यंत चांगला असलेल्या रस्त्याचे पुन्हा टेंडर काढून काम चालू केले आहे. म्हणजे यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. मुर्बी गाव ते सेंट्रल पार्क पर्यंतचे रस्ते तसेच गावातील रस्ते खड्डेमय झालेले आहेत. याकडे लक्ष नसून, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी फक्त स्वत:च्या फायद्याकरीता ठेकेदारांसाठी सोयीस्कर धोरणे राबविली जात आहेत. छत्रपती संभाजी महाराज मैदानामध्ये झुडपे वाढली आहेत. तरी महानगर पालिकेने याची दखल घ्यावी. नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून सुरक्षित ठेवावे. नागरिकांच्या जीवाशी खेळू नये असे ठणकावून सांगितले. हा पैसा जनतेचा असून, महानगरपालिकेला त्याची काहीच किंमत नाही. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्र केव्हा खड्डे मुक्त होणार? असा प्रश्न नागरिक करीत आहेत. तसेच कर्नाळा स्पोर्टस् समोरील चांगल्या रस्त्याचे कामाचे टेंडर काढले असून पुन्हा रस्त्याचे काम करत आहेत .महानगरपालिकेने याची देखील योग्य ती चौकशी करून दखल घ्यावी, अशी मागणी शिरीष घरत यांनी केली आहे.

## गौरीगणेश जाखडी नृत्य स्पर्धेत पेणजाई नृत्य कलापथक प्रथम

**। माणगाव । वार्ताहर ।**

मंडणगड तालुका कुणबी सेवा संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या गौरीगणेश जाखडी नृत्य स्पर्धेत पेणजाई नृत्य कलापथक पेण तर्फे तळे तालुका माणगाव यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. संभूराजू तुरेवाले सांस्कृतिक उन्नती मंडळ व ओम शिवशंभो उन्नती कला मंडळ रायगड रत्नागिरी यांच्या विद्यमाने सदर स्पर्धा कुणबी भवनचा राजा गणेशोत्सवात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पाच नृत्य कलापथकांनी सहभाग घेतला होता.

दुर्मिळ होत जाणारी जाखडी नृत्यकला जतन व संवर्धन करण्याचे काम पेणजाई नृत्यकला पथक करीत आहे. पारंपारिकता, अध्यात्मिकता व आधुनिक पद्धतीचा साज यांचा सुंदर मिलाफ घालून नृत्यकला सादर केली जाते. शाहीर भागोजी पोटले, शाहीर सदानंद अधिकारी, नृत्यकार घनश्याम मोंडे, सहकलाकार , ढोलकी वादक तुकाराम पोटले , सहदेव पोटले यांनी सुंदर सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. शाहीर शिवराम पोटले, शाहीर पोपट पोटले, शाहीर गजानन पोटले ,सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद अधिकारी, नामदेव ताम्हणकर, दगडू पाखड, कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ टेंभे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## पिरवाडी चौपाटीवर स्वच्छता अभियान

**। उरण । वार्ताहर ।**

उरण- चाकण- शिकरापुर एलपीजी पाईपलाईन व एचपीसीएल उरण भेंडखळ कंपनीचे महाप्रबंधक राजेंद्र टिकेकर यांच्या नेतृत्वाखाली पिरवाडी चौपाटीवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. गणपती बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी पिरवाडी चौपाटीवर विखुरलेला केरकचरा कामगारांनी गोळा करुन विल्हेवाट लावण्यात आली.

उरण- चाकण- शिकरापुर एलपीजी पाईपलाईन, एचपीसीएल कंपनीच्या वतीने राष्ट्रीय स्वच्छता अभियानाचा अंतर्गत गणेशोत्सवाचे औचित्य साधून उरण चौपाटीवर राबविण्यात आलेल्या अभियानात कंपनीचे महाप्रबंधक राजेंद्र टिकेकर, मुख्य प्रबंधक रोहित सी, वरिष्ठ प्रबंधक राहुल चव्हाण, प्रबंधक हेमंत कुमार , सहायक प्रबंधक शानू गुप्ता, अधिकारी रोशन मिश्र, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर तसेच कामगार सहभागी झाले होते. स्वच्छता ही सेवा अभियान, हे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे अभियान आहे, ज्याचा उद्देश रस्ते आणि पायाभूत सुविधा स्वच्छ ठेवणे आणि झाडे लावणे असा असल्याचे कंपनीचे अधिकारी यांनी पटवून दिले.



# स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचा आज महाड येथे मेळावा

**। पनवेल । वार्ताहर ।**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली महाड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन येथे स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचा आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व कार्यकर्त्यांचा स्वाभिमानी मेळावा सोमवारी (दि.१६)दुपारी दोन वाजता संपन्न होणार आहे.

या मेळाव्याचे आयोजन महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव व महाड शहराध्यक्ष सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या मेळाव्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर संसारे, महाराष्ट्र प्रदेशचे युवानेते अनिकेत संसारे, महासचिव अशोक वाघमारे, अरुण धीवर, मुंबई प्रदेशचे अध्यक्ष अमित हिरवे, विजय पवार, सिद्धार्थ पेडणेकर, महाराष्ट्राचे संघटक भगवान गरुड उपस्थित राहणार आहेत. या मेळव्यात मान्यवरांचे मार्गदर्शन उपस्थित पदाधिकारी आण कार्यकर्त्यांना लाभणार असल्याचे महेश साळुंखे यांनी सांगितले.

हा मेळावा जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या संकल्पनेतून घेण्यात येत आह . या मेळाव्यासाठी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे अध्यक्ष, शहरांचे अध्यक्ष व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. रायगड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी केले आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

● **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९

● **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९

● **दुकान भाड्याने मिळेल बेवुड,** गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

● **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१



# गणेशोत्सवातून समाजाचे 'जनप्रबोधन'

**जिल्हाभरात सार्वजनिक मंडळांकडून विविध देखाव्यांचे सादरीकरण करण्यात आले आहे. कुठे महिलांच्या संरक्षणाबाबत प्रबोधन, तर कुठे बेटी बचाव बेटी पढाव.. कुठे पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी उपाययोजना, वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी काय करावे.. कुठे स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांची शौर्यगाथा आदी विषयांवर यंदाच्या गणेशोत्सवातून सार्वजनिक गणेशमंडळांनी देखाव्यांच्या सादरीकरणातून जनप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या समाजप्रबोधन करणाऱ्या विषयांना पसंती मिळत आहे. काही मंडळांनी उत्सवाचे शतक, अर्धशतक ओलांडले असून, उत्सवाच्या माध्यमातून एका एकोपा टिकवून ठेवला आहे.**

## ५३ वर्षांची सामाजिक ऐक्याची परंपरा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या जुन्या मंडळांमध्ये तुर्भे स्टोअरमधील नवयुवक मित्र मंडळाचाही समावेश आहे. ५३ वर्षांपासून गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या माध्यमातून झोपडपट्टी परिसरातील सर्व नागरिकांमध्ये सामाजिक ऐक्याची भावना निर्माण केली जात आहे. आरोग्याविषयी जनजागृती व देखाव्यांमधूनही समाज प्रबोधनाचा वारसा जपण्यात आला आहे.

तुर्भे स्टोअर परिसरामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती सुरेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नवयुवक मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करत आहे. १९७२ मध्ये या उत्सवाला सुरुवात झाली. तेव्हापासून समाजप्रबोधनाचा हा वारसा अखंडपणे ५३ वर्षे सुरू आहे. पाच दशकाच्या वाटचालीमध्ये उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य वाढविण्यात यश आले आहे.



कष्टकरी नागरिकांची वसाहत असलेल्या तुर्भे स्टोअर्स परिसरातील नागरिकांमध्ये ऐक्य निर्माण करण्यात व समाज प्रबोधन व आरोग्य जागृती करण्यावर भर दिला जात आहे. मंडळाची सर्व कार्यकारिणी व सदस्य उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. यामध्ये मंडळाचे आधारस्तंभ सुरेश कुलकर्णी, सल्लागार महेश कुलकर्णी, ज्ञानदेव सुळसकर, अध्यक्ष अभिमान मंजुळकर, सचिव वसंत वास्के, खजिनदार केशवलाल मौर्य यांचा मोलाचा वाटा आहे.

प्रत्येक वर्षी आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते.या वर्षी शंकरा आय हॉस्पिटल च्या माध्यमातून मोफत डोळे तपासणी आणि चष्मे वाटप करण्यात आले. नागरिकांच्या आरोग्याची काळजी फक्त उत्सवापुरती मर्यादित न ठेवता वर्षभर नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी सुरेश कुलकर्णी यांच्या माध्यमातून यंत्रणा उभी केली आहे.

## रुढी परंपरांची सांगड घालणारा गणेशोत्सव

**। उरण । वार्ताहर ।**

मागील ८३ वर्षांची सलग पाच दिवस उत्सव साजरा करण्याची परंपरा जपणाऱ्या शिवकृपा मंडळाच्या शिव कृपा गौरा उत्सवाला प्रारंभ झाला आहे. उरण तालुक्यातील खोपटा येथील शिवकृपा गौरा उत्सवाच्या पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, गोंधळ, महिला पुरूषांचे पारंपरिक नृत्य, आरोग्य शिबीर तसेच बाळ्या नाच यासारख्या मनोरंजनाच्या विविध कार्यक्रमांची रेलचेल असते.



शुक्रवारी शिव कृपा गौरा मंडळाच्या वतीने आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामीण भागातील आबालवृद्धानी विशेष करून महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दर्शविला होता.

उरण तालुक्यातील खोपटे पाटीलपाडा येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने १९४१ साली शिवकृपा गौरा मंडळाची स्थापना केली. पूर्वी एका जुन्या घरात या शिवकृपा गौऱ्याची स्थापना केली जात होती. कालांतराने त्या घरमालकाने हे घर या शिवकृपा गौरा मंडळासाठी दिले. त्यानंतर त्याच ठिकाणी ग्रामस्थांच्या सहकार्याने शिवमंदिर उभारण्यात आले. तेव्हापासून या मंदिरात शिवकृपा गौऱ्याची प्रतिष्ठापना केली जात आहे. दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने हा सण गावकरी साजरा करत असून शिव कुपा गौरा मंडळाच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत.

यावर्षी शिवकृपा गौरा मंडळाचे ८३ वे वर्ष सुरू असून, मंडळाच्या माध्यमातून अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे गुणगौरव, चित्रकला स्पर्धेचे आयोजन तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार असे सामाजिक उपक्रम राबवले जात असल्याची माहिती मंडळाचे सचिव ॲड. सत्यवान भगत यांनी दिली.

## ढालकर गावचा सार्वजनिक गणेशोत्सव

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील ढालघर गावच्या श्री सिद्धी विनायक कला व क्रीडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने २७ व्या वर्षात यंदा पदार्पण केले आहे. या गणेशोत्सव मंडळाची स्थापना गावातील तरूणांनी, ज्येष्ठ नागरिकांनी, महिलांनी एकत्रित येऊन सन १९९९ रोजी केली. मंडळाचे हे २६ वे वर्ष असून, मंडळाने २७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. नवसाला पावणारा गणराय म्हणून या मंडळाच्या राजाची ओळख आहे. गणेशोत्सव काळात मंडळाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.



मंडळाचे संस्थापक संजय तेटगुरे, अध्यक्ष चंद्रकांत कडू, उपाध्यक्ष संजय खाडे, सदस्य राजेंद्र तेटगुरे, रुपेश तेटगुरे, बाळ ढमाले, सचिन पवार, प्रकाश तेटगुरे, योगेश तेटगुरे, वसंत खाडे, अविनाश तेटगुरे व सहकारी तसेच महिला मंडळाच्या अध्यक्षा शुभांगी पवार, उपाध्यक्षा सुचिता तेटगुरे, खजिनदार संगिता शिंदे, अनिता शिर्के, अंजना कडू, रूपाली कडू, ममता खडतर, संगीता तेटगुरे व सहकरी महिला यांच्यासह ढालघर ग्रामस्थ बंधू-भगिनी दरवर्षी भक्तिभावाने व उत्साहात हा उत्सव साजरा करीत असतात. अनंत चतुर्दशीला या गणरायाचे विसर्जन केले जाते.

## विक्रांत युवक मंडळाचा गणेशोत्सव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माथेरान शहरातील इंदिरा नगर भागात विक्रांत युवक मंडळाचा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बाप्पा ४४ वर्षांचा झाला आहे. यावर्षी प्रथमच हा बाप्पा खासगी जागेत बसविण्यात आला असून, तेथील गणेश मंदिराचा जीर्णोद्धार सुरू असल्याने बाप्पाची खासगी जागेत प्रतिष्ठापना केली आहे.

बाप्पाची स्थापना विकांत मंडळाचे कार्यकर्ते चंद्रकांत सुतार यांच्या घरी करण्यात आली. विक्रांत युवक मंडळाचे कार्यकर्ते चंद्रकांत सुतार, विजय मोरे, कल्पेश शिंदे, सीताराम मांडवकर, बाबू ढेबे, मालू ढेबे यांच्या लहानपणातील दगडाचा गणपती खेळताना तयार झाला. त्याला जयराज कळंबे यांनी मातीमध्ये आकार दिला



आणि तो गणपती बापा तेथील मंदिरात स्थापित झाला.

मंदिरात विक्रांत युवक मंडळाने आतापर्यंत दीड दिवसाचा गणपती सण साजरा करताना माथेरानच्या भौगोलिक परिस्थितीनुसार विविध देखावे सादर करून अनेक समस्यांना लोकांसमोर आणल्या आहेत. युवक मंडळाचे कार्यकर्ते यांच्या एकीमुळे या गणेश मंडळाला माथेरान पोलिसांकडून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

## साले गावचा एक गाव एक गणपती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्याच्या साले गावातील ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने एक गाव एक गणपती ही संकल्पना गेली अनेक वर्षे राबविली आहे. ही परंपरा गेल्या १२० वर्षांपासून सुरू आहे. ग्रामस्थांनी आपल्या या कृतीतून एक वेगळे अनुकरणीय पाऊल टाकत सर्वांपुढे आदर्शच उभा केला आहे. गणेशभक्तांच्या नवसाला पावणारा म्हणून या गणपतीची ओळख आहे. म्हणूनच दरवर्षी या गणपतीच्या दर्शनाला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगावपासून अवघ्या चार कि.मी. अंतरावर असलेले अत्यंत छोटे व निसर्गरम्य असे हे साले गाव आहे.

साले गावाच्या पश्चिमेला शिवगणेश मंदिर आहे. दरवर्षी गणेश चतुर्थीला भक्तगण या मंदिरात येतात.



त्यानंतर गेल्यावर्षी गावाने बोललेला सामूहिक व वैयक्तिक असे नवस फेडले जातात. त्यानंतर पुन्हा नव्याने भक्त आपापले वैयक्तिक नवस बोलतात, अशी प्रथा आहे. दुपारी एकनंतर सजविलेल्या पालखीतून पूर्वापार प्राचीन असणारी ही गणेशाची मूर्ती मंदिरालगत असलेल्या शिवकालीन तलावातून छातीभर पाण्यातून शंखनाद व मोरयाच्या गजरात फिरविली जाते. तलावातून पालखी फिरवण्याची ही प्रथा गेल्या कित्येक वर्षांपासूनची आहे. हा पालखी सोहळासुद्धा अनेकांसाठी आकर्षणाचा भाग असतो. नंतर ही पालखी गावातूनही फिरविण्यात येते. त्यानंतर ही पालखी मंदिरात गेल्यानंतर आरती होऊन मूर्तीची पुन्हा स्थापना केली जाते.

## खारपाटील कुटुंबाची ७० वर्षांची परंपरा

**। उरण । वार्ताहर ।**

७० वर्षांपूर्वी चिरनेर गावातील कै. कमला गणू खारपाटील यांनी गणपतीची स्थापना केली.त्यांनी मुलांना शिक्षण आणि सुसंस्कार दिले. त्यांची मुले गजानन, कृष्णा, गोपाळ यांनी शिक्षणाबरोबर अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला. आदर्श शिक्षक गजानन खारपाटील, त्यांच्या पत्नी आदर्श शिक्षिका शारदा खारपाटील, गोपाळ खारपाटील, सुगंधा खारपाटील यांनी अनेक विद्यार्थी घडवले. आज कामानिमित्त चिरनेर सोडून काही जण बाहेर असले तरी गणपती सणानिमित्ताने आवर्जून उपस्थित राहतात. एक कुटुंब, एक गणपती ही ७० वर्षांची परंपरा यापुढेही सुरू राहील, अशी ग्वाही मिलिंद, नितीन, कांचन, पंकज, शरद, दीपक खारपाटील यांनी दिली.

## डेक्कन जिमखानामध्ये पुन्हा गणेशोत्सव



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जवळपास दीड तपानंतर खंडित झालेला डेक्कन जिमखाना मित्र मंडळाचा गणेशोत्सव मंडळाच्या उत्साही तरूण कार्यकर्त्यांनी यावर्षीपासून पुन्हा सुरू केला आहे. प्रतिवर्षी डेक्कन जिमखाना मित्र मंडळाच्या वतीने दत्तजयंती उत्सव, दहीहंडी, शिवजयंती, होलिकोत्सव आदी कार्यक्रम मोठ्या हर्षोल्हासात साजरे केले जातात. यामध्ये आता काही वर्षांपूर्वी खंडित झालेला गणेशोत्सव पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील लहान थोर आनंदले आहेत.

कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथील दत्त मंदिरात विघ्नहर्ता गणेशाची स्थापना करण्यात आली होती. दत्त मंदिरात पुन्ह विराजमान झाल्या प्रित्यर्थ मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमादरम्यान ॲग्मे कलेक्शनच्या अश्विनी दाभणे यांच्या वतीने संगीत खुर्ची तसेच चमचा लिंबू स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. यामध्ये संगीत खुर्ची विजेत्यांना 'श्री विघ्नहर्ता' मानाची पैठणी बक्षीस देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते०

डेक्कन जिमखाना मित्र मंडळाचा हा खंडित झालेला गणेशोत्सव पुन्हा सुरू करण्यासाठी उत्सव समिती अध्यक्ष सुयोग हिंगमीरे, उपाध्यक्ष मयूर शितोळे, खजिनदार सुयश हिंगमिरे, सचिव किशोर तावरे यांच्यासह राहुल दाभणे, पंकज शिंदे, केतन शहा, कुणाल जगताप, वैभव पादीर, प्रतिक पादीर आदींनी मेहनत घेतली.

## साईनगर गणेशोत्सव मंडळाचा उत्सव

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील साईनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा संत गोरा कुंभार चलचित्र देखावा पाहण्यासाठी गणेश भक्तांची अलोट गर्दी होत आहे. साईनगरचा राजा हा माणगाव तालुक्याचा एक आकर्षण आहे. नवसाला पावणारा राजा म्हणून या मंडळाच्या गणरायाची ओळख असून, मंडळाचा हा दहा दिवसांचा गणराय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ साईनगर माणगाव या मंडळाची स्थापना सन २००२ साली करण्यात येऊन दरवर्षी या मंडळातर्फे गणेशोत्सव विविध कार्यक्रमांनी व



उत्साहात साजरे केले जाते. मंडळाचे सर्व सदस्य एकदिलाने गणरायाची सेवा करतात. तालुका स्तरीय सार्वजनिक गणपती उत्सव सजावट स्पर्धेत या मंडळाने सलग सहा वेळा प्रथम क्रमांक पटकावला आहे. दरवर्षी ऐतिहासिक व पौराणिक तसेच सामाजिक विषयावर आधारित चलचित्र देखावे उभारले जातात. गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष गणेश दूरकर, उपाध्यक्ष परेश म्हात्रे, सचिव प्रणव जंगम, केतन घोसाळकर, स्वप्नील झेंडे, केदार जाधव व त्यांचे सर्व सहकारी मेहनत घेत आहेत.

## 'शिवछाया'ने साकारला शिवराज्याभिषेकाचा देखावा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

तुर्भे येथील शिवछाया मित्र मंडळ यावर्षी ५४ वा सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करीत आहे. नवी मुंबईचा राजा अशी ख्याती असलेल्या या मंडळाने 'शिवराज्याभिषेक' देखावा उभारला आहे. बाप्पाच्या दर्शनासाठी व आकर्षक ठरलेला देखावा पाहण्यासाठी पहिल्या दिवसापासूनच भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे.

सभामंडपात ८० फूट लांब, ४० फूट रुंद व २५ फूट उंच अशा आकाराचा शिवराज्याभिषेकाचा देखावा असून, यात श्री गणेशाची दहा फुटांची मूर्ती विराजमान झाली आहे.



सालाबादप्रमाणे मंडाळातर्फे भजन, हरिपाठ, रक्तदान, आरोग्य शिबीर, आयुर्वेदिक चिकित्सा, अन्नदान, अथर्वशीर्ष वाचन, नवी मुंबईतील कलावंतांचा सन्मान केला जात आहे. हा उत्सव साजरा करण्यासाठी अध्यक्ष अंकुश वैती, उपाध्यक्ष सुशील घरत, अशोक पाटील, रामकृष्ण पाटील, संजय गुरव, नंदकुमार पाटील, अनिल हेलेकर आदी मेहनत घेतात.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक हितेंद्र बलदेव दास सोमैया यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे पळसदरी तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५५/२ | एकुण क्षेत्र ०-१५-०० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी मालक यांचा अर्धा अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-०७-५० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-०९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १५/०९/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता- कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक जेकब अब्राहम वासकर रा. मु. वढाव पो. बामणगाव ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| वढाव बुद्रुक ता. अलिबाग, जि.रायगड | १७४/२ | ०-६४-५० ०-०६-६० एकूण ०-७१-१० | १६.१२ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीपैकी ०-१६-०० हे. आर. पॉ. ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : १६/०९/२०२४ **ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत.**

| जमीन मालकाचे नांव | गावाचे नांव | सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री. प्रेमनाथ आत्माराम पाटील २) श्रीमती बबिता प्रेमनाथ पाटील रा.मातृछाया सी.एच.एस.रिध्दी कॉम्प्लेक्स-२. ए-१०१ प्लॉट नं.३८ ते ४१, सेक्टर १३. खांदा कॉलनी. नविन पनवेल पश्चिम, जिल्हा-रायगड | साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी | १३/५/अ | ०-२१-६० | ०-३९ |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, साठे करार, ताबा, वयाणा पावती गहाण दान दक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आंत खाली सही करणार यांजकडे सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली. दिनांक - १४/०९/२०२४


**श्री. प्रदीप पांडुरंग सांगळे**
मु.पो. लोधिवली, तालुका - खालापूर,
जिल्हा-रायगड.
मोबाईल नंबर - ९७६९३२४९३९

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### डायमंड लीग स्पर्धेत

# नीरज दुसऱ्या स्थानावर

## अवघ्या एका सेंटीमीटरने हुकले जेतेपद



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नीरज चोप्राने डायमंड लीगच्या अंतिम फेरीत दुसरे स्थान पटकावले आणि अंतिम फेरीत ८७.८६ मीटरचा सर्वोत्तम थ्रो केला. अवघ्या एक सेंटीमीटरने त्याचं जेतेपद हुकलं. ग्रेनेडाचा खेळाडूने नीरजसमोर बाजी मारली. ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स पहिल्या क्रमांकावर राहिला. त्याने ८७.८७ मीटर थ्रो केला. अँडरसनने २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते. जिथे भारताच्या नीरजने रौप्यपदक जिंकले होते. पॅरिसमध्ये सुवर्णपदक जिंकणारा पाकिस्तानी खेळाडू अर्शद नदीम डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी झाला नव्हता.

डायमंड लीगच्या अंतिम फेरीत एकूण ७ भालाफेकपटू सहभागी झाले होते. नीरज चोप्राने अंतिम फेरीत ८६.८२ मीटरचा पहिला थ्रो केला. यानंतर त्याने ८३.४९ मीटरचा दुसरा थ्रो केला. तिसऱ्या थ्रोमध्ये नीरजने पुनरागमन केले आणि त्याने ८७.८६ मीटरचा तिसरा थ्रो केला. या थ्रो मुळे नीरज दुसऱ्या स्थानावर पोहोचू शकला. यानंतर त्याचे दोन थ्रो ८५ मीटरपेक्षा कमी होते. नीरजने ८६.४६ मीटरचा शेवटचा थ्रो केला.

डायमंड लीग फायनलमधील नीरज चोप्राचे ६ थ्रो- पहिला थ्रो- ८६.८२ मी, दुसरा थ्रो- ८३.४९ मी, तिसरा थ्रो- ८७.८६ मी, चौथा थ्रो- ८२.०४ मी, पाचवा थ्रो ८३.३० मी, सहावा थ्रो- ८६.४६, डायमंड लीग स्पर्धेत अँडरसन पीटर्स पहिला तर नीरज चोप्रा दुसरा राहिला. जर्मन स्टार ज्युलियन वेबरने ८५.९७ च्या सर्वोत्तम थ्रोसह तिसरे स्थान पटकावले. भालाफेकीत भारतासाठी दोन ऑलिम्पिक पदकं जिंकणारा नीरज चोप्रा हा पहिला खेळाडू आहे. त्याने टोकियो २०२० मध्ये सुवर्ण पदक आणि पॅरिस २०२४ मध्ये रौप्य पदक जिंकले. याशिवाय त्याने डायमंड लीग २०२२ ही स्पर्धा जिंकली आहे. २०२३ मध्ये तो दुसऱ्या क्रमांकावर राहिला. डायमंड लीगमध्ये चॅम्पियन बनल्यास खेळाडूंना पदक मिळत नाही. तर विजेतेपद जिंकल्यावर, खेळाडूला जागतिक अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी बक्षीस रक्कम आणि वाइल्ड कार्ड दिले जाते.

अँडरसन पीटर्सने प्रथमच डायमंड लीगचे विजेतेपद पटकावले. गेल्या महिन्यात पॅरिस येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत त्याने कांस्यपदक जिंकले होते. पीटर्सने दोन वेळा वर्ल्ड चॅम्पियनशिपही जिंकली आहे. २०१९ आणि २०२२ मध्ये त्याने ही कामगिरी केली. याशिवाय राष्ट्रकुल स्पर्धेत एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले. ९३.०७मीटर हा पीटर्सचा कारकिर्दीतील सर्वोत्तम थ्रो आहे.

## दोड्डा गणेश यांची केनियाच्या मुख्य प्रशिक्षक पदावरून हकालपट्टी



**। केनिया । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू दोड्डा गणेश यांची केनिया पुरूष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी काही दिवसांपूर्वीच नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, आता अवघ्या महिन्याभरानंतर क्रिकेट केनियाने मोठा निर्णय घेत त्यांना या पदावरून हटवले आहे. माजी भारतीय वेगवान गोलंदाज दोड्डा गणेश गेल्या महिन्यात म्हणजेच १४ ऑगस्ट रोजी केनिया क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक बनले होते.

केनियाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून दोड्डा गणेश यांची नियुक्ती ही अंतरिम मुख्य प्रशिक्षक म्हणून लॅमेक ओन्यांगो यांच्या कार्यकाळानंतर झाली. दोड्डा गणेश यांच्या कोचिंग स्टाफमध्ये ओनयांगो, जोसेफ अंगारा आणि जोसेफ असिची यांचाही या समावेश होता.

दोड्डा यांच्या नियुक्तीनंतर ते केनिया क्रिकेट संघाला नवी दिशा देतील, असे मानले जात होते. परंतु नियुक्ती झाल्यानंतर अवघ्या ३० दिवसांनी त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला. दोड्डा गणेश यांना एक पत्र पाठवण्यात आले होते की, कार्यकारी मंडळाने प्रस्थापित प्रक्रियेचे पालन न केल्यामुळे राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यास नकार दिला आहे.

दोड्डा गणेश यांना जे पत्र देण्यात आले त्यात म्हटले होते की, क्रिकेट केनियाच्या कार्यकारी मंडळाने बुधवार, २८ ऑगस्ट २०२४ रोजी पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने आणि क्रिकेट केनिया घटनेच्या अनुच्छेद ५.९ आणि ८.४.३ नुसार, आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो की कार्यकारी मंडळाने पुरुष क्रिकेट राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून तुमची नियुक्ती मंजूर करण्यास नकार दिला आहे. आता नवीन प्रशिक्षक कोण हा प्रश्न आहे.

# तर... पाकिस्तानने भारतात खेळू नये

## मोईन खानने भरले कान

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पुढील वर्षी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ची तयारी जोरात सुरू आहे. मात्र, या स्पर्धेसाठी टीम इंडिया पाकिस्तानला जाणार की नाही. हे अद्याप ठरलेले नाही. राजकीय मुद्द्यांवरून दोन्ही देशांमध्ये तणावाचे वातावरण आहे. त्याचा परिणाम क्रिकेटवरही दिसून येत आहे. २०१२ पासून भारत आणि पाकिस्तानमध्ये कोणतीही द्विपक्षीय मालिका खेळली गेली नाही. आता चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. त्यामुळे टीम इंडिया पाकिस्तानात जाणार की यावर चर्चा सुरु आहे. अशात पाकिस्तानचा माजी खेळाडू मोईन खाने टीम इंडियाबद्दल मोठे वक्तव्य केलं आहे.

भारताने २००८ मध्ये शेवटचा पाकिस्तान दौरा केला होता. २०२३ मध्ये जेव्हा पाकिस्तानला आशिया चषक स्पर्धेचे यजमानपद मिळाले. तेव्हाही भारताने शेजारच्या देशात जाण्यास नकार दिला होता. त्यामुळे ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलच्या आधारे खेळवण्यात आली होती. अशा परिस्थितीत



चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ देखील अशाच पद्धतीने आयोजित केली जाऊ शकते. मात्र, पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू पाकिस्तानात खेळण्याचा आग्रह धरत आहेत. अलीकडेच पाकिस्तानचा माजी कर्णधार मोईन खान याने भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानात येण्याचा इशारा दिला आहे. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारत पाकिस्तानमध्ये आला नाही, तर पाकिस्ताननेही भारतात होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होण्याचा विचार करावा, असे त्यांचे म्हणणे आहे.

पाकिस्तान गेल्या वर्षी वर्ल्ड कप २०२३ साठी भारतात आला होता. मोईन खानने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला सांगितले की, भारताने आयसीसीसोबत केलेल्या आपल्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे आणि जर ते पूर्ण झाले नाही, तर पाकिस्तानने भविष्यात भारतात होणाऱ्या कोणत्याही स्पर्धेत सहभागी होण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करावा. मात्र, याशिवाय मोईन खानने सचिन तेंडुलकर आणि सौरव गांगुली यांसारख्या दिग्गज खेळाडूंना बीसीसीआयची समजूत काढण्याची विनंती केली. मोईन खान म्हणाला, सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, कपिल देव, राहुल द्रविड यांसारख्या माजी भारतीय क्रिकेटपटूंनी त्यांच्या क्रिकेट बोर्डांना राजकारणापासून क्रिकेट दूर ठेवण्यास सांगितले पाहिजे. कारण राजकीय मुद्द्यांवरून खेळात व्यत्यय आणू नये. चाहत्यांना भारत आणि पाकिस्तानचा सामना पाहायला आवडतो. याचा फायदा केवळ पाकिस्तानलाच होणार नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वालाही होईल.

# लाल मातीच्या खेळपट्टीवर बांगलादेशला धूळ चारणार

### ■ भारतीय क्रिकेट संघाचा नेटमध्ये कसून सराव

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारत आणि बांग्लादेश यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका १९ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. या मालिकेसाठी दोन्ही संघ सज्ज झाले आहेत. भारतीय संघाने गौतम गंभीरच्या प्रशिक्षणाखाली सराव सुरु केला आहे.

बांगलादेशने पाकिस्तानला त्यांच्याच भूमीवर धोबीपछाड दिल्याने टीम इंडियाने धास्ती घेतली आहे. यासाठी भारतीय खेळाडू नेटमध्ये घाम गाळत आहेत. दुसरीकडे, बांगलादेशला कोंडीत पकडण्यासाठी भारतीय संघाने एक खास प्लान आखला आहे.



सामन्यासाठी कोणती खेळपट्टी वापरली जाणार याबाबतची एक माहिती समोर आली आहे. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियममध्ये पहिला कसोटी सामना खेळला जाणार आहे. या मैदानात शक्यतो काळ्या मातीची खेळपट्टी वापरली जाते. ही खेळपट्टी फिरकीपटूंना मदत करते. तसेच या खेळपट्टीवर खेळण्याचा बांगलादेशला चांगला अनुभव आहे. काळ्या मातीची खेळपट्टी धीमी असते. त्यामुळे काळ्या मातीऐवजी लाल मातीच्या खेळपट्टीवर सामना खेळवला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

लाल मातीची खेळपट्टी खासकरून वेगवान गोलंदाजांना मदत करणारी असते. तसेच भारतीय फलंदाजांना या खेळपट्टीवर चांगला तग धरता येईल. २०१९ साली बांगलादेशचा संघ भारत दौऱ्यावर आला होता. तेव्हा इंदौर आणि कोलकात्यात वेगवान गोलंदाजांना मदत करणाऱ्या खेळपट्टीचा वापर केला होता. तेव्हा भारताच्या फिरकीपटूंनी ४० पैकी ५ विकेट घेतल्या होत्या.

१२ सप्टेंबरापासून इंडियाने चेन्नईच्या चेपॉक मैदानावर सराव करण्यास सुरुवात केली आहे. इंडियाचं पहिलं शिबीर काळ्या मातीच्या पिचवर पार पडलं. रोहित, जयस्वाल, गिल आणि कोहलीने यावेळी दोन नेट गोलंदाजांसह काळ्या मातीच्या पिचवर सराव केला. तसेच रवींद्र जडेजा, आर अश्विन, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजने फलंदाजीत चांगली धमक दाखवली आहे. आता सामन्याकडे लक्ष आहे.

## सीपीएल २०२४ मध्ये चालू सामन्यात वाद

**बोसेजू स्टेडियम :** कॅरिबियन प्रीमियर लीग म्हणजेच २०२४ चा १० वा सामना सेंट लुसिया किंग्स आणि गयाना अॅमेझॉन वॉरियर्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यादरम्यान आरसीबीचे वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफ आणि शिमरॉन हेटमायर यांच्यातील वातावरण थोडे तापले. हेटमायरने चेंडू जोसेफच्या दिशेने खेळला. जोसेफने आपला संयम गमावला आणि चेंडू हेटमायरच्या दिशेने फेकला आणि नंतर त्याच्याकडे रोखून पाहिले. शिमरॉन हेटमायरने त्याचा बदला घेतला. जोसेफच्या चेंडूवर त्याने गगनचुंबी षटकार ठोकला. हेटमायरने चेंडूला स्टार बनवले. प्रेक्षक खुश झाले.

## रायगडच्या मुलींचा संघ पहिल्यांदाच सुपरलिगमध्ये दाखल

**। रायगड । वार्ताहर ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित पंधरा वर्षाखालील मुलींची आंतरजिल्हा निमंत्रित निवडचाचणी क्रिकेट स्पर्धा पुणे येथे सुरू आहे. त्यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींनी चमकदार कामगिरी करत साखळी फेरीत अवल स्थान प्राप्त करुन आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच सुपरलिगमध्ये दिमाखात प्रवेश मिळवला आहे.



एमसीएच्या स्पर्धेपूर्वी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ३ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याचा फायदा संघाला झाला. रायगडच्या संघाची कर्णधार रोशनी पारधी हिने लागोपाठ दोन शतके झळकावली असून आपल्या धुवाधार फलंदाजीने एकूण ३०१ धावा काढून संघाला एक हाती विजय मिळवून दिला.

रायगड संघाने सांगली व सिडीए क्लब विरूद्ध विजय मिळवला तर हिंगलो संघाविरूद्ध पावसामुळे सामना अनिर्णीत राहिला व दोन्ही संघाला एक गुण देण्यात आला.

ग्रुप सी मध्ये रायगडच्या संघाने अवल स्थान प्राप्त केले आहे. लवकरच सुपरलिग फेरीतील सामने सुरू होतील. जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने संघाला नवीन किट व धुवाधार फलंदाज रोशनी पारधी हिला इंग्लिश विल्लो बॅट बक्षिस म्हणून जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी जाहिर केले आहे. संपूर्ण संघाचे व प्रशिक्षकांचे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.येणाऱ्या क्रिकेट हंगामात मुलींच्या क्रिकेट कडे आपण विशेष लक्ष देऊन मुलींच्या विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धा व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# अफगाणिस्तानात क्रिकेटवर बंदी?

## तालिबानच्या निर्णयाने क्रीडा विश्वाचे लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान क्रिकेट संघाने अल्पावधीतच क्रिकेटमध्ये नावलौकिक मिळवला आहे. अफगाणिस्तान संघ कसोटी क्रिकेटचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. असं असताना तालिबान सरकारच्या डोळ्यात क्रिकेट खुपलेलं दिसत आहे. त्यामुळे देशात क्रिकेटवर पूर्णपणे बंदी घालण्याची तयारी तालिबान सरकारने केली असल्याची चर्चा आहे.

तालिबानी नेता हिबतुल्लाह अखुंदजादा यांनी देशात क्रिकेटवर बंदी घालण्याचे आदेश दिल्याचं वृत्त आहे. याबाबतची बातमी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये आली आहे. या वृत्तानुसार, क्रिकेटमुळे देशात वाईट वातावरण तयार होत आहे.तसेच हा खेळ शरिया कायद्याच्या विरोधात असल्याचं म्हणणं आहे. त्यामुळे या खेळावर बंदी घालण्यात येत असल्याचं तालिबानचा नेता हिबतुला अखुंदजादा याने सांगितलं. देशात तालिबान सरकार आल्यानंतर सरकारने पहिल्यांदा महिला क्रिकेट आणि महिला सहभागी होत असलेल्या इतर खेळांवर बंदी घातली होती.



# शमीचं टीम इंडियात पुनरागमन होणार कधी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

वन-डे वर्ल्ड कप २०२३ मध्ये धमाकेदार कामगिरी करणारा स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी सध्या मैदानाबाहेर आहे. त्याने २०२३ वन-डे वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यानंतरसामना खेळलेला नाही. पायाच्या दुखापतीमुळे वर्षाच्या सुरुवातीला त्याच्यावर शस्त्रक्रिया देखील झाली. त्यामुळे गेल्या आठ महिन्यांपासून मैदानाबाहेर असून तो आता ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेतून पुनरागमन करण्याची शक्यता आहे.

शमी सद्यस्थितीतील एक अनुभवी गोलंदाज आहे. पुढील आठवड्यात चेन्नई येथे सुरू होणाऱ्या बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी तो संघात परतण्याची अपेक्षा होती. परंतु, दुलीप ट्रॉफी न खेळल्याने निवड समितीकडून त्याच्या नावाचा बांगलादेश दौऱ्यातील कसोटीसाठी विचार करण्यात आला नाही. ऑक्टोबरमध्ये शमी क्रिकेटमध्ये पुनरागमन करेल. जिथे तो ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी बंगाल संघामधून रणजी ट्रॉफी स्पर्धा खेळेल व न्यूझीलंड विरुद्ध तीनपैकी एक कसोटी सामना खेळेल.



शमीने सांगितले की, तो १०० टक्के तंदुरुस्त झाल्यावरच राष्ट्रीय संघात पुनरागमन करेल म्हणजे पुन्हा दुखापत होण्याचा धोका नाही.

### शेकाप नेते जयंत पाटील, पंडित पाटील यांची उपस्थिती

# नेहुलीत आज कुस्त्यांची 'दंगल'

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील श्री बहिरेश्वर मित्र मंडळ व शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत तसेच इंडिया आघाडीच्या सहकार्याने कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांच्या हस्ते तसेच माजी आ. पंडित पाटील यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१६) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास या स्पर्धेचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस अॅड. आस्वाद पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती सुरेश पाटील, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे युवा सेना रायगड जिल्हा प्रमुख पिंट्या ठाकूर, खंडाळेचे सरपंच नासिकेत कावजी, माजी उपसरपंच विनोद पाटील, माजी सदस्य नरेश गोंधळी, माजी तंटामुक्त अध्यक्ष संतोष गुरव, अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष विलास वालेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा संघटक ऋषीकांत भगत, खंडाळेचे सदस्य रुपेश पाटील, उद्योजक अर्जून चिमणे आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री बहिरेश्वर मित्र मंडळ नेहुलीचे अध्यक्ष विजय थळे यांनी दिली. गेल्या अनेक वर्षापासून श्री बहिरेश्वर मित्र मंडळाच्यावतीने कुस्ती स्पर्धा भरविली जात आहे. गावे, वाड्यांमधील कुस्ती मल्लांना या स्पर्धेच्या माध्यमातून हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे, असे श्री बहिरेश्वर मित्र मंडळ नेहुलीचे उपाध्यक्ष प्रभाकर पाटील आणि आखाडा प्रमुख बबन पाटील यांनी सांगितले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)